**सुविचार**

कल्पनायें एक खूँखार शेर की तरह हैं, इन्हें उग्र मत बनने दें ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८९ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# गत १० वर्षांत देशाचा चेहरामोहरा बदलला



मुंबई : गेल्या १० वर्षांमध्ये आमच्या सरकारच्या काळात भारतातील बँकिंग व्यवस्थेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला असून स्वस्त मोबाईल फोन, स्वस्त डेटा आणि झिरो बॅलन्स असणारी जनधन खाती या त्रिवेणी संगमाने भारतात कमाल केली आहे. पूर्वी लोक भारतात यायचे तेव्हा येथील सांस्कृतिक विविधता (कल्चरल डायव्हर्सिटी) पाहून थक्क व्हायचे. मात्र, आज जगातील लोक जेव्हा भारतात येतात तेव्हा येथील फिनटेक डायव्हर्सिटी पाहून भारावून जातात असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते शुक्रवारी मुंबईतील जिओ सेंटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२४ च्या व्यासपीठावरुन बोलत होते.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी जगभरातून आलेल्या उद्योजकांच्या समोर आपल्या सरकारच्या निर्णयांचा पाढा वाचताना पूर्वीच्या काँग्रेसशासित राजवटीवर टीका केली. त्यांनी म्हटले की, गेल्या १० वर्षांमध्ये भारतातील फिनटेक क्षेत्रात ३१ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक झाली आहे. या काळात देशातील फिनटेक स्टार्टअपमध्ये ५०० टक्क्यांची वाढ झाली आहे. याशिवाय, स्वस्त मोबाईल फोन, स्वस्त डेटा आणि झिरो बॅलन्स जनधन खात्यांनी भारतात कमाल केली आहे असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.

पूर्वी स्वत:ला विद्वान समजणारे लोक संसदेत उभे राहून भारतातील फिनटेक क्रांतीविषयी प्रश्न उपस्थित करायचे. जेव्हा सरस्वती बुद्धी वाटत होती, तेव्हा हेच लोक रस्त्यात पहिले उभे होते. पण हे लोक म्हणायचे की, भारतातील गावांमध्ये बँकेच्या शाखा नाहीत, इंटरनेट नाही, वीज नाही, मग रिचार्जिंग कुठून करणार? अशा परिस्थितीत भारतात फिनटेक क्रांती कशी होणार, असा सवाल हे विद्वान लोक माझ्यासारख्या चहावाल्याला विचारायचे. पण आज बघा, फक्त एका दशकात भारतातील ब्रॉडबँड युजर्सची संख्या ६ कोटीवरुन ९४ कोटीपर्यंत पोहोचली आहे. आज देशात क्वचितच अशी व्यक्ती असेल की, जी १८ वर्षांची आहे. त्याच्याकडे त्याची डिजिटल ओळख असणारे आधार कार्ड नाही. आजघडीला देशातील ५३ कोटी लोकांकडे जनधन खाती आहेत. याचा अर्थ गेल्या १० वर्षांमध्ये आम्ही युरोपियन महासंघातील देशांच्या एकत्रित संख्येइतक्या लोकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले, असा दावा पंतप्रधान मोदी यांनी केला.

भारतात ट्रान्सफॉर्मेशनला गती

गेल्या १० वर्षांमध्ये जनधन, आधार मोबाईल या त्रिवेणीने स्थित्यंतराच्या प्रक्रियेला गती दिली आहे. (पान ५ वर)

# महाराजांच्या नावाला साजेसे स्मारक उभारणार

सिंधुदुर्ग : सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्लयावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची घटना समोर आली. या प्रकरणावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजकोट किल्लयावर भेट देत. पुतळा कोसळला त्या ठिकाणची पाहणी केली. यावेळी पवार यांनी नवीन पुतळा बसवण्यासाठी राज्य सरकारने गेल्या दोन दिवसांपासून बैठका घेतल्याची माहिती दिली. यावेळी अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती दिली.



दोन दिवसापूर्वी घडलेल्या घटनेचे सर्वांनाच दु:ख आहे. याबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया आल्या आहेत. मी या खोलात जात नाही, छत्रपती शिवाजी महाराज हे उभ्या महाराष्ट्राचे दैवत आहेत. प्रत्येकाला महाराजांचा इतिहासाचा अभिमान आहे, अनेक ठिकाणी महाराजांचे पुतळे आहेत. अनेकजण या ठिकाणी नतमस्तक होतात. या ठिकाणी समाधानही मिळत असते. आता या ठिकाणी महाराजांच्या नावाला साजेसा असा पुतळा या ठिकाणी होणार आहे, याबाबत राज्य सरकारने निर्णयही घेतला आहे. या ठिकाणी शेजारी असणारी जमीन घेण्याबाबत विचार सुरू आहे. ते खासगी व्यक्ती या कामासाठी द्यायला तयार आहे. बारकाईने लक्ष देऊन पुन्हा या ठिकाणी पुतळा उभारला जाणार आहे. दोन दिवसापासून राज्य सरकार यासाठी बैठका घेत आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले, समुद्राकाठी अनेकठिकाणी महापुरुषांचे पुतळे आहेत. यावेळी वा-याच्या वेगाचा अभ्यास केला जातो. हा पुतळा नटबोल्ट गंजल्यामुळे कोसळल्याचे बोलले जात आहे. ज्यावेळी नेव्ही डे दिवशी या पुतळ्याचे उद्घाटन केले होते. त्यावेळी मी स्वत: या ठिकाणी उपस्थित होतो. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे होते. अनावरण केले त्यावेळी सगळे व्यवस्थित दिसत होते. आता या प्रकरणाची सर्व चौकशी केली जाणार आहे. सर्वांना ताब्यात घेतले जाणार आहे.

वाद घालण्यात अर्थ नाही

पुतळा प्रकरणी मी महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागितली. (पान ५ वर)

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणांवर डोके ठेवून माफी मागतो



पालघर : मालवण इथल्या राजकोट किल्लयावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावण ढवळून निघाले आहे. यापार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाढवण इथल्या जाहीर कार्यक्रमातून माफी मागितली आहे. सिंधुदुर्गात जे काही झाले ते माझ्या सर्व सहका-यांसाठी दु:खदायक असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले.

मोदी म्हणाले भाजपने मला सर्वांत आधी पंतप्रधान म्हणून निवडले तेव्हा मी सर्वप्रथम रायगडच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासमोर नतमस्तक झालो होतो. पण गेल्या काळात सिंधुदुर्गात जे झाले ते माझ्या सर्व सहका-यांना याचे वाईट वाटले. आमच्यासाठी शिवाजी महाराज हे केवळ राजे-महाराजे नाहीत तर महाराष्ट्राचे कर्तेधर्ते आहेत. आज मी डोकं झुकवून माझ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणात मस्तक ठेऊन माफी मागतो, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.

# भारताच्या लेकीची सुवर्ण भरारी



पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारताला केवळ सहा पदके जिंकता आली. यामध्ये एकाही सुवर्ण पदकाचा समावेश नव्हता. मात्र, पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताला स्पर्धेच्या दुस-याच दिवशी सुवर्ण पदक जिंकता आले. अवनी लेखरा हिने सोनेरी कामगिरी करत तमाम भारतीयांना जल्लोष करण्याची संधी दिली. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये देशाला पहिले सुवर्ण पदक मिळाले आहे. भारताच्या अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल एकेरीत सुवर्ण पदक पटकावले आणि अवनी देशाच्या अपेक्षांवर खरी उतरली.

टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारतासाठी एका सुवर्ण पदकासह दोन पदके जिंकणारी नेमबाज अवनी लेखरा हिने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतासाठी आणखी एक सुवर्ण पदक जिंकून कमाल केली. तिने स्पर्धेच्या दुस-याच दिवशी १० मीटर एअर रायफल स्टँडिंग प्रकारात भारतासाठी सुवर्ण पदक जिंकले. अशा प्रकारे पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताने शानदार सुरुवात केली आहे. याशिवाय भारताच्या मोना अग्रवालने याच स्पर्धेत कांस्य पदक पटकावले आहे.

दरम्यान, मागील ऑलिम्पिकमधील आपलाच विक्रम मोडण्यात अवनीला यश आले. तिने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये २४९.६ च्या स्कोअरने पॅरालिम्पिकमध्ये विक्रम बनवला होता. यावेळी तिने २४९.७ धावा केल्या आणि तिचाच पॅरालिम्पिकमधील विक्रम मोडला. तर, भारताच्या मोना अग्रवालने २२८.७ गुणांसह तिसरे (पान ५ वर)

# शरद पवारांनी झेड प्लस सुरक्षा नाकारली



नवी दिल्ली : शरद पवार यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा प्रस्ताव केंद्राच्या गृह विभागाने मांडला आहे. यानिमित्त दिल्लीतील पवारांच्या निवासस्थानी गृह विभागाच्या अधिका-यांची बैठक पार पडली. या बैठकीत विविध गोष्टींवर चर्चा झाली. पण शरद पवारांनी झेड प्लस सुरक्षा नाकारली असल्याची माहिती मिळाली आहे.

शरद पवार यांच्या निवासस्थानी सीआरपीएफया अधिका-यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत आपल्याला अतिरिक्त सुरक्षेची आवश्यकता नसल्याचे पवारांनी अधिका-यांना सांगितले. तसेच जी काही सुरक्षा व्यवस्था द्यायची असेल ती घराच्या बाहेर रहू द्या. गाडी बदलणे, गाडीत २ सुरक्षा रक्षक असण्याला त्यांनी नकार दिला आहे. दरम्यान, सुरक्षा देण्याचे कुठलेही कारण शरद पवार यांना अधिका-यांनी सांगितलेले नाही. त्यामुळे खुद्द शरद पवारचे सुरक्षेबाबत अनभिज्ञ आहेत. नेमकी सुरक्षा रक्षकांकडे अशी कुठली माहिती आहे, ज्यामुळे शरद पवारांच्या जीवाला धोका असू शकतो. हे खुद्द पवारांनाच सांगण्यात आलेले नाही. त्यामुळे मला (पान ५ वर)

# महिला सबलीकरणात एसबीआयचे भरीव योगदान




लातूर : महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहून आर्थिक स्वावलंबी व्हावे, यासाठी सरकारकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. भारतीय स्टेट बँकेचेही महिला सबलीकरणाच्या कार्यात भरीव योगदान असून महिला बचत गटांना कर्ज पुरवठा करण्यात बँक नेहमीच आघाडीवर राहिली आहे, असे मत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी व्यक्त केले.

भारतीय स्टेट बँकेच्या (स्टेट बँक ऑफ इंडिया) क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाच्या वतीने मंगळवारी (दि. २७) कार्निवल रिसॉर्टमध्ये आयोजित कर्ज वाटप मेळाव्याच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, बँकेचे महाव्यवस्थापक अनिरुद्ध कुमार चौधरी, बँकेच्या नांदेडच्या प्रशासकीय कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक प्रियाकुमार सरिगाला, लातूरच्या व्यवसाय कार्यालयाचे क्षेत्रीय प्रबंधक अमर सिंह, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, ऋऋसर्वच क्षेत्रात महिलांनी स्वतःचे स्थान मजबूत केले आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक साक्षर व स्वावलंबी होऊन स्वतःचा व कुटुंबाचा उत्कर्ष साधावा.ऋऋ श्री. सागर म्हणाले, ऋऋभारतीय स्टेट बँकेने आजच्या मेळाव्यातून बचत गटांना दहा कोटीचे कर्ज वाटप केले आहे. बचत गटांनी आपली उत्पादने बाजारामध्ये आणून त्याचे ब्रँडींग, मार्केटिंग व पॅकेजिंग करण्यासाठी प्रयत्न करावेत. गटांच्या उत्पादनाना वाव मिळावा म्हणून हिरकणी मार्ट सुरू करण्यात आला आहे. श्री. चौधरी यांनी स्टेट बँक सदैव (पान ५ वर)

## मोना अग्रवालने जिंकले कांस्य पदक

पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिक प्रमाणेच पॅरालिम्पिकमध्येही भारताने नेमबाजीतून पदकाची सुरुवात केली आहे. टोकियो ऑलिम्पिकमधील गत चॅम्पियन अवनी लखेरा हिच्यासह १० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएच१ प्रकारात मोना अग्रवालने भारताला पदक मिळवून दिले. अवनी लखेरा हिने टोकियो पॅरालिम्पिक २४९.६ हा रेकॉर्ड मोडित काढत २४९.७ गुणांसह नवा विक्रम प्रस्थापित केला. दुसरीकडे मोना हिने २२८.७ गुणांसह तिस-या स्थानावर राहिली. दक्षिण कोरियाच्या युनरी लीनं २४६.८ गुणांसह रौप्य पदक कमावले. ३७ वर्षीय पॅरा शूटर मोना अग्रवाल हिने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये तीन प्रकारच्या स्पर्धेत भाग घेतला आहे. महिला १० मीटर एअर रायफल स्टँडिंग आर २ स्पर्धेत कांस्य पदक पटकवाणीर मोना मिश्र ५० मीटर (पान ५ वर)



**देगलूर - बिलोली मतदार संघाचे विद्यमान आमदार जितेश अंतापुरकर यांनी आज मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस,माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण,भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपा मध्ये प्रवेश केला.**

# राज्यात २ सप्टेंबरपासून पुन्हा मुसळधार

पुणे/मुंबई : शेतकरी बांधवांना येत्या दोन दिवसांमध्ये शेतातील सर्व कामे उरकून घ्यावीत कारण राज्यात २ सप्टेंबरपासून पुन्हा मुसळधार पावसाचे संकेत हवामान अभ्यासकांनी दिले आहेत. हवामान अभ्यासकांनी म्हटले आहे की कारण येत्या दोन ते सहा सप्टेंबर दरम्यान राज्यभरामध्ये जोरदार पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला. तसेच जायकवाडी धरण ही १०० टक्के भरणार असल्याचेही डख यांनी सांगितले आहे.

पंजाब डख यांनी आज एक हवामान अंदाज व्यक्त केला असून ज्यानुसार शेतक-यांनी उसाला खत टाकणे, उडीद मूग काढून घेणे, असे कामे करून घेण्याचे सांगितले आहे. कारण राज्यातील जवळपास २१ जिल्ह्यांमध्ये (पान ५ वर)

# निवळी येथील विविध विकास कामाचा शुभारंभ आ. रमेशअप्पा कराड यांचा ग्रामस्थांशी संवाद



लातूर / प्रतिनिधी- लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथील ३८ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा भूमिपूजन आणि शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते गुरुवारी सकाळी करण्यात आला यावेळी निवळी येथील ग्रामस्थांशी संवाद साधून शासनाच्या विविध योजना, गावातील विकास कामे यासह विविध विषयावर चर्चा केली.

मौजे निवळी येथील समाज मंदिर ७ लक्ष, अण्णाभाऊ साठे स्टेज शुभारंभ ५ लक्ष, ज्योतिबा मंदिर परिसरातील पेव्हर ब्लॉक ५ लक्ष २० हजार, २ ठिकाणच्या समशानभूमीचे बांधकाम १५ लक्ष, ज्योतिबा मंदिरात आरो फिल्टर २ लक्ष ८० हजार, दलित वस्तीत आरो फिल्टर २ लक्ष ८५ हजार रुपये आदी ३८ लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आला यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, सांगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, युवा मोर्चाचे सुरज शिंदे, संभाजी वायाळ, काशिनाथ ढगे, विश्वास कावळे, निवळीचे सरपंच अभय सोनपेठकर, उपसरपंच राजाराम शिंदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

निवळी गावात येतात आ. रमेशआप्पा कराड यांनी ग्रामदैवत श्री निळकंठेश्वर मंदिरात जाऊन विधिवत पूजा करून दर्शन घेतले. या मंदिर परिसरात तीर्थक्षेत्र विकास योजनेतून मंजूर झालेल्या दोन कोटी रुपये खर्चाच्या येत्या काळात होणाऱ्या विकास कामाची पाहणी केली. निवळी गावातील विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात त्या त्या भागातील ग्रामस्थांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्याशी संवाद साधून विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

शासनाच्या विविध योजनेची माहिती देऊन या योजनेचा लाभ कोणा - कोणाला मिळाला असे विविध प्रश्न विचारून निवळी ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. कराड म्हणाले की, काँग्रेसच्या सत्तेच्या काळात तोंड बघून योजनेचा लाभ दिला जात होता. भाजपाच्या काळात जो गरीब आहे, जो पात्र लाभार्थी आहे अशा सर्वांना लाभ दिला मिळत असून मागील काळात देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार मुख्यमंत्री ग्राम सडक यासह अनेक जनहिताच्या योजना (पान ५ वर)



**लातूर शहरातील विशालनगर येथील काशीविश्वेश्वर मंदीर येथे शिवकथा व परमरहस्य पारायण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी या सोहळयास भेट दिली. शिवकथा ऐकली आणि शिवकथाकार अमृतेश्वर शिवाचार्य महाराज व डॉ. शांतवीरलींग शिवाचार्य महाराज यांचे आशिर्वाद घेतले.**

## लोकाधिकार संघ पंढरपूर तालुकाप्रमुखपदी बाळू ब्रह्मदेव चव्हाण यांची नियुक्ती जाहीर



लातूर :- लोकाधिकार संघ या संघटनेच्या पंढरपूर तालुकाप्रमुख पदी पंढरपूर येथील श्री. बाळू ब्रह्मदेव चव्हाण यांची नियुक्ती लोकाधिकारप्रमुख मा. श्री. व्यंकटरावजी पनाळे यांनी केली आहे.

पंढरपूर तालुकाप्रमुख पदी नियुक्ती केल्याचे नियुक्तीपत्र लोकाधिकार संघाचे लोकाधिकारप्रमुख मा. श्री व्यंकटरावजी पनाळे यांच्या हस्ते दिनांक २६ ऑगस्ट २०२४ वार सोमवार रोजी पंढरपूर तालुकाप्रमुख श्री. बाळू ब्रह्मदेव चव्हाण यांना देण्यात आले आहे. बाळू चव्हाण यांच्या पंढरपूर तालुका प्रमुखपदी झालेल्या नियुक्तीचे लोकाधिकार संघाचे सोलापूर जिल्हाप्रमुख सुहासराव शिंदे यांनी स्वागत केले आहे.

## विज्ञान मेळावा म्हणजे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना चालना: कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे



लातूर / प्रतिनिधी- शैक्षणिक क्षेत्रामध्ये लातूर पॅटर्न हा सर्वपरिचित आहे परंतु अलीकडे सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सुद्धा लातूरने एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. शासनातर्फे तालुका, जिल्हा आणि विभागस्तरीय नाट्योत्सव स्पर्धा घेण्यात येत आहे यामध्ये विद्यार्थ्यांमधील कलागुणांना चालना मिळते आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये वाढ घडून येते असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांनी केले

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूरच्यावतीने विभागस्तर विद्यार्थी विज्ञान मेळावा आणि विभागस्तर विज्ञान नाट्योत्सव २०२४ उद्घाटन कार्यक्रम महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वनाने झाली. यावेळी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, पठाण एस.एम, प्रा. परमेश्वर पाटील, परीक्षक प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. संदिपान जगदाळे, प्रा. सुशील कोरे प्रा. ज्ञानोबा आव्हाड, प्रा. कोमल गोमारे आणि प्रा. शिवलिंग नागापुरे उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रदीप दिंडेगावे म्हणाले की, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग लातूर आणि शिक्षण विभागीय उपसंचालक कार्यालय, लातूर यांच्याद्वारे आमच्या महाविद्यालयातील सभागृहांमध्ये तालुका, जिल्हा आणि आता विभागस्तरीय स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी दिल्याबद्दल त्यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सहभागी स्पर्धकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक शिवलिंग नागापुरे यांनी केले. शुभेच्छापर मनोगत विस्तार अधिकारी थेटे, गटशिक्षणाधिकारी व्यवहारे, काजी, यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय गुणवान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सदैव कौतुक करत असतो. त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी व तसेच कलागुणांच्या प्रदर्शनासाठी आग्रही भूमिका घेऊन त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असतो. या शिक्षण संस्थेचं आणि महाविद्यालयाच एकच उद्देश आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून आणणे.

या कार्यक्रमांमध्ये पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढविण्याचं कार्य प्रा. डॉ. संदिपान जगदाळे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घनश्याम ताडेवार यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी डावकरे, संगमेश्वर मुळे, बिराजदार गुरुप्रसाद, सय्यद जलील यांनी प्रयत्न केले.



## श्री केशवराज मा. विद्यालयात प्रहारी गटाची बैठक संपन्न

लातूर / प्रतिनिधी- श्री केशवराज मा.विद्यालयात प्रहारी गट प्रमुख विद्यार्थ्यांची बैठक मा. मुख्याध्यापक श्री संजय कुलकर्णी यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.या बैठकीला सर्व वर्गातील एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते.

शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयीचा अंगीकार करावा, गुटखा, तंबाखू, जर्दा किंवा इतर नशा आणणाऱ्या पदार्थापासून दूर रहावे यासाठी प्रहारी समिती कार्य करते.

या बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे होणारे दुष्परिणाम याविषयी माहिती सांगितली.तसेच व्यसन करणारे इतर विद्यार्थी वर्गात असतील तर त्यांची माहिती गुप्तपणे येऊन समिती प्रमुख किंवा समितीतील सदस्य शिक्षक सदस्य यांच्याकडे द्यावी याबाबत त्यांना आवाहन करण्यात आले. वर्ग स्वच्छता, शिस्त यावर भर द्यावा, एखादी अनुचित घटना घडली तर कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीसाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका मा श्रीमती राजश्री कुलकर्णी, समितीप्रमुख श्रीमती अनुपमा पाटील,अभ्यास मंडळ प्रमुख श्री प्रल्हाद माले उपस्थित होते. एक युद्ध नशे के विरुद्ध अशी घोषणा देवून बैठकीची सांगता करण्यात आली.

## प्रा. लक्ष्मण हाके यांचा अहमदपूर मध्ये सत्कार

अहमदपूर / प्रतिनिधी- ओबीसी आरक्षणाचे योद्धा म्हणून परिचित असलेले आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. लक्ष्मण हाके यांचा अहमदपूर येथे नुकताच सत्कार करण्यात आला. प्रा. लक्ष्मण हाके हे लातूर हुन नांदेड कडे अहमदपूर शहरातून कार्यक्रमासाठी जात असताना अहमदपूर येथील गणेश दादा हाके पाटील यांच्या निवासस्थानी प्रा. लक्ष्मण हाके सरांचा यथोचित सत्कार करुन त्यांच्या पुढील सामाजिक कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, जिल्हा चिटणीस हणमंत देवकते, पंचायत समितीचे माजी उपसभापती बालासाहेब गुट्टे, माजी पंचायत समिती सदस्य माणिक नरवटे यांच्या सह ओबीसी समाज बांधव सत्कार सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेन्शनर्स असोसिएशन कार्यकारिणी जाहीर


**शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी-** तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्या अडचणी सोडविण्यासाठी पेन्शनर्स असोसिएशनची तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून धनाजी लखनगावे, तर सचिव म्हणून शब्बीर पटेल यांची बिनविरोध निवड केली आहे.

जिल्हाध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन त्यात निवड करण्यात आली. कार्यकारिणीत शिवाजी धानुरे, माधव पारशेट्टे, शिवाजी एरंडे, भागवत शिंदे, पी. एम. दुरूगकर, सुरेखा उस्तुर्गे, नानजकर यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी प्रभाकर कुलकर्णी, शिवाजी एरंडे, शिरुरे, आदी उपस्थित होते.

## शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये पॉवर टॉक

औसा: (प्रतिनिधी) तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात पॉवर टॉक या पाश्र्वभुमीवर सोशल स्कील्स अॅन्ड इमोशनल इंटेलेजीएन्स फॉर जॉब मार्केट या विषयावर संजय कुमार सिंघ, रीक्रुरमेंट एक्सपर्ट, रायपुर छत्तीसगड यांनी विद्यार्थ्यांना दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सिरी एज्युटेक कोल्हापुर संस्थेचे सचिन कुंभोजे, विश्र्वजीत काशीद, आयआयएम. टेडएक्स व अतंरराष्ट्रीय वक्ते, महाविद्यालयाचे प्राचार्य विश्र्वेश्र्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, डॉ समीर शफी,




डॉ. अजय फुगटे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल चे प्रमुख युवराज काटु, प्रा. किरण रोडगे इत्यादी मंचावर उपस्थित होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे जॉब मार्केटसाठी सामाजिक कौशल्ये आणि भावनिक बुद्धिमत्ता सुधारण्यासाठी आणि आजच्या आधुनिक जगात कौशल्य ज्ञानाचे महत्व कसे आहे. तसेच व्यवसाय आणि बाजारपेठेची सखोल माहिती मिळवण्याची संधी महाविद्यालयाने सदरील मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना प्राप्त करुन दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका उंबरे व सुषमा गजगे या विद्यार्थीनीने केले तर आभार प्राचार्य विश्र्वेश्र्वर धाराशिवे यांनी मानले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

## वृक्षसंवर्धन करणे का गरजेचे आहे?

निसर्ग आपल्याला भरभरून देतो. माणूस त्याच्या अंगाखांद्यावर जगतो आहे. निसर्ग आपला गुरू आहे. तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतं आज हाच माणूस आपल्या उपकारकर्त्यावर उलटला आहे.

मनमोही पावसाने निसर्गासारखेच माझ्या अंतर्मनाला मोहविले आहे. झिमझिमणार्या पावसात सृष्टीचे सुजलाम् सुफलाम् रूप न्याहाळताना नकळत तुकाराम महाराजांचे भावमधुर काव्य आणि स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या सुरेल स्वरांचा साज लाभलेले कर्णमधुर गीताने कान टवकारले -

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।

पक्षीही सुस्वरे आळवीती ।।

वृक्ष आणि वेली निसर्गाचे सर्वोत्तम वरदान. संथपणे एका लयीत बरसणार्या पावसाच्या सरींनी बहरलेल्या सृजनशील निसर्गाच्या सान्निध्यात सृष्टीचा दृक्श्राव्य अनुभव घेता यावा, यासारखे भाग्य ते कोणते? मनातील आठवणींची पिसे भिरभिरू लागली.

धरणीमातेने मुक्त हस्ते बहाल केलेला मौल्यवान खजिना म्हणजे वृक्ष आणि वेली. 'परोपकाराय फलन्ति वृक्षाः' या शब्दात वृक्षांचा गौरव केलेला आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील स्नेहसंबंध फार पुरातन कालापासून आहे. अगदी अनादी कालापासून निसर्ग मानवाचा मित्र आहे. वृक्ष ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे. अलीकडे पर्यावरण प्रदूषणाविषयी बरेच काही वर्तमानपत्रातून वाचायला मिळते. प्रदूषणाचे दुष्परिणाम आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवू लागले आहेत. आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्याच पृथ्वीचा, मानवाने सुरू केलेल्या जंगलतोडीमुळे पृथ्वीचा समतोल बिघडत चाललेला आहे. वृक्षांचे महत्व संतांनी फार पुर्वी सांगीतले आहे . संत तुकारा म्हणतात ' वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे' या अभंगातून ते वृक्षांचे आपल्या जीवनातील महत्व सांगतात. वृक्ष तोडीमुळे जमीनीची ,मातीची धूप होते, प्रदुषणात वाढ होते, तसेच तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे . वृक्ष तोडीमुळे जगंल ओस पडु लागली. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होत आहे तसेच जमीनीवर पाण्याचे साठे आणि भुगर्भातील पाणी पातळी वाढत नाही. औषधी वनस्पती पण कमी होत आहे . दुष्काळाचे प्रमाण वाढत आहे . या सर्व गोष्टीचा विचार केला तर वृक्षसंवर्धन खुप गरजेचे आहे हे लक्षात येते. यासाठी सर्वांनी मिळुन प्रयत्न केले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करणे, त्यांचे संगोपण करणे, वृक्ष तोड थांबवणे गरजेचे आहे . वृक्ष लागवडीचे फायद्यांचा प्रचार करणे. भूजल पातळीत वाढ करणे. या उपाय योजना कराव्यात.

******

**-सौजन्यः राजेंद्र लटंगे डिकसाळ**

## मुलीची छेड काढल्याच्या निषेधार्थ लातुरातील महात्मा फुले भाजी मार्केट बंद




लातूर - भाजी खरेदी करण्यासाठी गेलेल्या तरुणीचा एका भाजी विक्रेत्याने तिची छेड काढून विनयभंग केल्याची संतापजनक घटना लातूर शहरातील महात्मा फुले भाजी मार्केटमध्ये गुरुवारी २९ ऑगस्ट रोजी घडली होती. आजम काझी या भाजी विक्रेत्या आरोपीस गांधी चौक पोलिसांनी अटकहि केली आहे. मात्र त्याच्या दुकानाचा परवाना रद्द करावा आणि सदर तरुणास कडक शिक्षा द्यावी ही मागणी करत या घटनेच्या निषेधार्थ भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे, वीर यौद्धा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत रांजणकर, माजी नगरसेवक रवी सूडे, अॅड. गणेश गोमचाळे, अॅड. दिग्विजय काथवटे, श्री मजोज सूर्यवंशी मनोज डोंगरेसह हिंदुत्ववादी संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेवून आज ३० ऑगस्ट रोजी लातूर शहरातील गुळ मार्केटजवळील महात्मा फुले भाजी मार्केट बंद केले. आज महात्मा फुले भाजी मार्केटमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला, सर्व भाजी विक्रेत्यांनी या बंदला पाठींबा देत आपापली दुकाने बंद ठेवली होती. यापुढे मुलींच्या छेडछाडीचे प्रकार कदापी खपवून घेतले जाणार नाहीत असा इशारा भाजप शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळेसह हिंदुत्ववादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## श्री गणेश उत्सवाच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना सुरू करा

लातूर / प्रतिनिधी- येणाऱ्या गणेशोत्सवासाठी महानगरपालिका, पोलिस प्रशासन, धर्मादाय आयुक्त कार्यालय या सर्वांचे परवाने सर्व गणेश मंडळांना घेणे बंधनकारक आहे.

हे सर्व परवाने घेताना मंडळाच्या कार्यकर्त्यांना अनेक समस्यानां तोंड द्यावे लागते,परवाने मिळवण्यासाठी विविध कार्यालयांत खेटे मारावे लागतात हा त्रास व दिरंगाई टाळण्यासाठी व सुलभतेने परवाने मिळावेत यासाठी प्रशासनाने एक खिडकी योजना सुरू करावी असे आवाहन मनपा आयुक्तांना एका निवेदनाद्वारे करण्यात आले असून या निवेदनावर मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष अशोक गोविंदपुरकर , संस्थापक सचिव बसवंत भरडे यांच्यासह अभय शहा, सुमुख गोविदपुरकर, सुनील कोटलवार, अॅड उमाशंकर पाटील, नागेश उटगे, अजित कोटे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## एक कडवं सत्य

कितीही पैसे द्या....,
कामवाली घरच्यासारखं
झाडत नाही. आणि....
पोळीवालीही घरच्यासारख्या
पोळ्या करत नाही.

आई-वडिलांसारखी,
छाया नाही आणि....
भावंडांसारखी माया नाही!

हॉटेलच्या बिर्याणीला,
घरच्या खिचडीची चव नाही
आणि.....
कितीही यूट्यूब बघा,
थिएटरची सर नाही.

साडीतलं सौदर्य कुठल्याच
पोशाखात नाही आणि.....
कितीही मेकअप करा,
साधेपणासारखं सौदर्य नाही!

कितीही कलमं करा,
गावठी गुलाबाला तोड नाही
आणि......
कितीही अत्तरं आणा,
जाई,जुई अन् मोगऱ्याची
सर नाही.

शेताची सर बागेला नाही
आणि.....
बागेची सर टेरेसला नाही.

भाजीभाकरीची चव
पिझ्झा बर्गरला नाही
आणि.....
क्रिडांगणाची सर,
जिमला नाही.

स्वतः सांगितल्याशिवाय
प्रेमासारखं निरागस प्रेम नाही
आणि.....
जीवनांत प्रेम करणा-या
जोडीदारासारखा,
दुसरा आधार नाही.

कितीही टॅली वापरा त्याला
खतावणीची सर नाही
आणि.....
पावकी-निमकीची मजा
कॅलक्युलेटरला नाही.

कितीही परिश्रम करा,
दैवाशिवाय काही मिळत नाही
आणि.....
कितीही हुशार असा ईश्वरापुढं
कुणाचंच काही चालत नाही.

कितीही पाणी द्या
पावसाशिवाय....
झाड काही खुलत नाही,
कितीही पैसे असु द्या पण,
माणसांशिवाय काहीच भागत
नाही.

खरं प्रेम केल्याशिवाय प्रेमाची
गोडी समजत नाही,
आपल्या आवडत्या
व्यक्तिबरोबर बोलल्याशिवाय
मन मोकळं होत नाही.

अनुभवासारखा शिक्षक नाही
आणि.....
जगल्याशिवाय आयुष्य
समजतच नाही.

मुलांशिवाय घराला शोभा
नाही
आणि....
नातवंडासारखा परमानंद
जगात नाही!

शालीनतेसारखा दागिना नाही
आणि....
झोपडीतलं प्रेम बंगल्यात
नाही.

स्वार्थापेक्षा मोठा शत्रू नाही
आणि....
परोपकारासारखं पुण्य नाही.

सुखाच्या क्षणी माणसांशिवाय
शोभा नाही पण दुःखाशिवाय
आपलं कोण, परकं कोण ?
ते कळतंच नाही.

भक्तीसारखी शांतता
कशातच नाही आणि....
भगवंताएवढं बलवान
कुणीच नाही.
घरची माया वृद्धाश्रमात नाही
आणि.....
म्हातारपणी कुटूंबाशिवाय
कुणीच नाही !!!

**नमो कृष्णाय**

## मंदिरात पहाऱ्याची सेवा करून मिळणाऱ्या ऊर्जेचा अनुभव घ्या : ह. भ.प. ज्ञानराज महाराज

औसा/ प्रतिनिधी- नाथ मंदिरात श्रावणमास अनुष्ठानत टाळ सप्ताहात उभ्या असलेल्या अखंड विना व टाळ या सेवेत सर्वांनी विशेषतः तरुण भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन विना पहाऱ्याची ऊर्जा व ताकद काय असते याचा अनुभव घ्या असे आवाहन ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी केले आहे.



श्रावणमास अनुष्ठानात नाथ मंदिरातील नित्य चक्रीभजन सेवेनंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्र्वरी च्या प्रवचना वेळी ते बोलत होते. श्रावण आरंभापासून १८ व्या अध्यायातील ९ व्या श्र्लोकातील ५,६,७,८ या ओव्यानरूप निरुपणात ज्ञानराज म्हणतात आपल्याला वाटतं वीणा पहारा आणि टाळ सप्ताहातील हा सतत विठ्ठल नामस्मरण करीत वाजणारा टाळ यात काय विशेष, पण गळ्यात वीणा आणि हाताने विठ्ठल नामस्मरण करीत वाजणारा टाळ ही मनुष्यास एक ऊर्जा व ताकद प्रदान करते याचा अनुभव विना पहारा करून आपण घेऊ शकता या परंपरेत अनेक निष्ठावंत भक्तांना या नाथ मंदिरात वीणा पहारा करताना विठ्ठल परमात्म्याचे आणि सद्गुरूंचे साक्षात दर्शन झाल्याची अनुभूती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भावेविण देव नकळेंनी संधेह गुरुविण अनुभव कैसा कळे. गुरु संगतीने मंदिरात नामस्मरणात अथवा त्यांनी निर्देश केलेल्या सेवेत आपण एकाग्र व एकनिष्ठ चित्ताने आणि शुद्ध निरपेक्ष भावनेने समर्पित झालात तर असे दर्शनास पात्र ठरू शकता असे महाराज म्हणाले. निष्काम कर्म का करायचे हे भगवान श्रीकृष्णाने सूर्य नारायणास देखील सांगितले असे निष्काम कर्माला खूप महत्त्व आहे. आज कालच्या कलियुगात निष्काम कर्म हे लोक विसरून जात आहेत शेवटी बहिऱ्यांना जसे संगीत गायन ऐकवून उपयोग नाही जसे मर्कटाला आद्रकाचा स्वाद कसा हे ठाऊक नाही चोराला चांदण्याचा उपयोग नाही तसेच जे नास्तिक आणि मोह लालसेसह अहंकारात गुरफटून भगवंताचे नामाशिवाय दिनचर्या करतात त्यांना निष्काम सेवा ही कशी ठाऊक असणार असा सवाल करीत संत सांगतात ते प्रत्येक वचन नव्हे प्रत्येक शब्द म्हणजे एक एक ग्रंथ एकेक उपदेश आणि जीवन उद्धार करण्याचे सूत्र असल्याचे ज्ञानराज महाराज म्हणतात. गुरुवारी एकादशी दिनी श्री आत्तार, राहुल तुळशीराम चिकनाळे अरविंदराव साळुंखे सारोळा, मृदंगाचार्य विजयकुमार पंडित, पुरुषोत्तम दादा पंडित, नागनाथ देवकते , दिलीप माधवराव शिंदे मुगाव व मुगाव ग्रामस्थ दिंडी आदींनी आपली माळ सेवा रुजू केली.

### आत्मबोध ५

धर्म, अधर्म जाणती ।
बंध, मोक्ष समजती ।
स्वरूप, हेतू, फळ जाणती ।
सात्विक बुद्धी ।। १ ।।

धर्म, अधर्म कळेना ।
बंध मोक्ष समजेना ।
स्वरूप, हेतू, फळ कळेना ।
राजस बुद्धी ।। २ ।।

अधर्मच धर्म वाटते ।
विपरीत ज्ञान होते ।
अज्ञानातच रमते ।
तामस बुद्धी ।। ३ ।।

बुद्धीचे तीन प्रकार ।
कोणते स्वीकारणार ।
साधना करणार ।
आपण सर्व ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
२०/०१/२०२२

### आत्मबोध ६

निष्काम कर्म, ध्यानयोगाने ।
निषिद्ध विषयांकडे न जाणे ।
प्राणेंद्रियांना स्वाधीन ठेवणे ।
सात्विक धैर्य ।। १ ।।

सकाम धर्म करणे ।
पैसा, स्त्री अपेक्षिणे ।
प्राप्ती, रक्षणाचा निश्र्चय
करणे ।
राजस धैर्य ।। २ ।।

सतत निद्रा कवटाळणे ।
शत्रुभय, शोक करणे ।
मिथ्या अभिमान धरणे ।
तामस धैर्य ।। ३ ।।

धैर्याच्या तीन रीती ।
कोणती स्वीकारिती ।
सात्विक धैर्यावर प्रीती ।
अखंड करू ।। ४ ।।
सिद्धदास, सोलापूर
२१/०१/२०२२

यशवंत धाराशिव जिल्हा
शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४


कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# विहीर अधिग्रहणाचे प्रलंबित १९ कोटी तात्काळ द्यावेत – दुधगावकर

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – ऑक्टोबर २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीत पाणी टंचाई निवारणासाठी शेतकऱ्यांच्या अधिग्रहण केलेल्या विहीर, विंधन विहिर व टँकरचे प्रलंबित १९ कोटी रुपये जिल्ह्याला तात्काळ देण्यात यावेत, अशी मागणी राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, सन २०२३-२४ वर्षामध्ये जिल्ह्यात अत्यंत कमी पावसामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. पाणी टंचाई व दुष्काळ परिस्थितीमुळे जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, तुळजापूर, भूम, परंडा, वाशी, उमरगा व लोहारा या ८ तालुक्यातील १०१ गावांमध्ये जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी १२२ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला. तसेच ३७१ गावांमध्ये ८८६ विहीर व विंधन विहीर अधिगृहण दि. १ ऑक्टोबर २०२३ ते दि. ३० जून २०२४ या कालावधीमध्ये केले आहे. तर मागील काळातील शासनाकडे १९ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या विहीर व विंधन विहीर अधिकरण व टँकरचे पैसे प्रलंबित आहेत. ही रक्कम येत्या ४ दिवसात संबंधितांना देण्याबाबत आदेशित करावे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दुधगावकर यांनी दिला आहे.

# शेतकऱ्यांच्या चेहर्यावरील आनंद मोठे समाधान देणारे

## आ. पाटील यांच्या हस्ते तेरणा धरणाचे जलपूजन



**तेरणा धरणातून बंद पाईपलाईनद्वारे थेट शेतात पाणी पुरवठा करण्याचा पथदर्शी प्रकल्प आपण आणला होता. राज्यात पहिल्यांदाच अशा प्रकारचा प्रकल्प राबविला असल्यामुळे त्यात काही तांत्रिक दोष आढळल्याने योजना बंद आहे. मात्र आगामी काळात या पथदर्शी प्रकल्पातील तांत्रिक दोष दूर करून योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आपले प्रयत्न सुरु राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – यावर्षी सुरूवातीपासूनच चांगला पाऊस झाला. ऑगस्ट महिन्यातच तेरणा धरण भरून ओसंडून वाहू लागल्याने धरण परिसरातील शेतकर्यांच्या चेहर्यावर आनंद दिसू लागला आहे. त्यांचा हा आनंद आपल्यासाठी समाधानकारक व प्रेरणा देणारा असल्याची भावना आ राणाजगजितसिंह पाटील यांनी दि.३० ऑगस्ट रोजी व्यक्त केली.

आ पाटील यांच्या हस्ते तेरणा धरणाचे जलपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी अनंतराव देशमुख, झुंबर बोडके, निहाल काझी, तानाजी गायकवाड, बाळासाहेब खांडेकर, नरहरी बडवे महाराज, गुणवंत देशमुख, नीलकंठ पाटील, ज्ञानेश्र्वर जंगाले, दत्ताभाऊ तिवारी, बबलू मोमीन, रमेश भोसले, अमोल पाटील, नासेर शेख, एजाज काझी, विलास रसाळ, कुमार लोमटे, शिव सुरवसे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ पाटील म्हणाले की, तेरणा कालवा दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून महायुती सरकारने त्यासाठी ३ कोटींचा निधी दिला आहे. तर डावा कालवा दुरुस्तीचे काम जवळपास ७० टक्के पूर्ण झाले आहे. रब्बी हंगामात या कालव्याद्वारे डिसेंबरमध्ये पहिल्या आवर्तनाचे पाणी सोडण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना अधिकार्यांना दिल्या आहेत. तसेच उजव्या कालव्याच्या साफसफाईचे काम काही प्रमाणात झाले आहे. पावसामुळे कालव्यात पाणी असल्याने दुरुस्तीचे काम सध्या बंद असले तरी हे काम देखील लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी सिंचन क्षेत्रात केलेल्या कामामुळेच जिल्ह्यातील उसाच्या क्षेत्रात मोठी वाढ होऊन साखर कारखान्यांची संख्या एक वरून चौदा वर गेली आहे. तर या व्यतिरिक्त गूळ पावडर कारखान्यांची संख्याही तेरावर पोहोचली असल्याचे त्यांनी नमूद केले. एकेकाळी जिल्ह्यात एकच कारखाना असताना सुद्धा परराज्यातून ऊस आणावा लागत होता, आज ही परिस्थिती एवढी बदलली आहे की, जिल्ह्यात ३० कारखान्यांना पुरेल एवढा ऊस उपलब्ध होत आहे. ही हरित क्रांती केवळ डॉ पद्मसिंह पाटील यांनी केलेल्या कामामुळेच शक्य झाली आहे. त्या माध्यमातून आज शेतकर्यांच्या घरात जवळपास दीड हजार कोटींपेक्षा अधिकची रक्कम दरवर्षी येत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तेरणा धरण परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री सप्तश्रृंगी देवी दर्शन यात्रेत महिलांनी लुटला मनमुराद आनंद

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री सप्तशृंगी देवी दर्शन यात्रेचा महिलांनी मनमुराद आनंद लुटला.

श्रावणमासनिमित्त आ राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे यावर्षीही महिलांसाठी अर्चनाताई पाटील यांच्यावतीने देवस्थान दर्शन यात्रा आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री सप्तश्रृंगी गड, रेणुका माता आणि नाशिक येथील त्र्यंबकेश्र्वर येथे दर्शन सहल आयोजित करण्यात आली. यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इतक्या मोठ्या संख्येत महिला असलेली ट्रिप सुरू झाली आणि प्रत्येक महिलेने मनमुराद आनंद लुटला.

ही दर्शन यात्रा दि.२८ ऑगस्ट रोजी धाराशिव येथील प्रतिष्ठान भवन येथून पहाटे निघाली होती. रात्रीपर्यंत या महिलांनी या सहलीचा आनंद लुटला. धाराशिव शहरातील छत्रपति शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सहलीची सुरुवात झाली. यावेळी धाराशिव तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



श्रावण महिन्यानिमित्त धाराशिव तालुक्यातील भाविक महिलांना श्री सप्तश्रृंगी गड वणी, चांदवड येथील रेणुका माता, नाशिक येथील त्र्यंबकेश्र्वर येथे दर्शनाची संधी उपलब्ध करून दिली होती. यासाठी ८ बसेसची सोय करण्यात आली. श्री सप्तश्रृंगी गड नाशिकपासून ६० कि.मी अंतरावर कळवण तालुक्यात स्थित आहे. देवीचे मंदिर ७ शिखरांनी वेढलेले असून समुद्रसपाटीपासून ४६५९ फुट उंचीवर आहे. यास महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्ध शक्तीपीठ' मानले जाते. देवीची ८ फुट उंचीची मुर्ती पाषाणात कोरलेली असून दोन्ही बाजुस ९ असे एकुण १८ हात व त्यात विविध आयुधे असलेली आहे. या ठिकाणी माता भगवती निवास करते. सप्तश्रृंग या शब्दाचा अर्थ सात शिखरे असा आहे. सप्तश्रृंगीदेवीचे दर्शनानंतर शेकडो महिलांसह नजीकच्या चांदवड येथील रेणुका माता, नाशिक येथील त्र्यंबकेश्र्वर येथेही दर्शन घेतले. यामुळे महिलांचा आनंद द्विगुणित झाला. या सहलीनिमित्त महिलांची हितगुज करताना अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, देवदर्शन एक निमित्त आहे, देवदर्शन आपण आपल्या गावात सुद्धा करू शकतो. पण महिलांना कधीही घराच्या बाहेर पडून स्वतःसाठी आनंद घेता येत नाही. त्यामुळे मी दरवर्षी अशा सहलीचे नियोजन करते. तर महिलांमधून ज्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया येतात, त्या जो आनंद घेतात. त्यामुळे माझा स्वतःचा आनंद द्विगुणीत होऊन पुन्हा पुन्हा अशा सहलीचे नियोजन करावे असे माझ्या मनामध्ये सतत येत राहते. यंदाच्या या ट्रीपला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आम्ही स्वतः सुद्धा इतक्या मोठ्या प्रमाणात महिला घेतल्यामुळे सांशक होतो की महिला कसा प्रतिसाद देतील. परंतू महिलांनी इतका सुंदर या सहलीचा आनंद लुटला. कुठल्याही प्रकारे गालबोट न लागता निर्विघ्नपणे महिलांना सुखरूप घरी सोडल्याचे माझ्या मनामध्ये समाधान आहे. अशीच सहल तुळजापूर तालुक्यातील महिलांसाठी दर्शन सहल दि.३० सप्टेंबर रोजी निघणार असून त्यालाही असाच उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या सहलीमध्ये सहभागी झालेल्या महिलांनीही अर्चनाताईच्या माध्यमातून आपल्याला सहलीचा पहिल्यांदाच आनंद घेता आला व आपण सहल कशी असते ? हे पाहिल्याचे जाणीवपूर्वक नमूद केले. यावेळी देवस्थान प्रशासनाच्यावतीने अर्चनाताई पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

# भोसले हायस्कूलच्यावतीने साक्षरता अभियान

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – शहरातील श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्यावतीने भारत सरकारद्वारा नवभारत साक्षरता अभियानांतर्गत भारतीय एकही नागरिक असाक्षर न राहता शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाच्या शालेय परिसरात प्रसार व प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या फेरीत प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, प्रशासकीय अधिकारी तथा माजी मुख्याध्यापक साहेबराव देशमुख, सर्वेवर इयत्ता ७ वी पर्यवेक्षक राजेंद्र आंबेवाडीकर,




गुरुवर्य के.टी. फाऊंडेशनचे प्रमुख डॉ. विनोद आंबेवाडीकर , अभियान प्रमुख कलाध्यापक शेषनाथ वाघ, सर्वेवर सहशिक्षक श्यामराव राठोड, दिपक केंगार, कलाध्यापक शिवाजी भोसले आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर व विद्यार्थी उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ मुख्यमंत्री झाला

## बहिणींनी मानले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार



धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – राज्यभरात मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. धाराशिव तालुक्यातील सोनेगाव येथील लाडक्या बहिणींनी तर चक्क लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ मुख्यमंत्री झाला.... लाडक्या बहिणींची काळजी त्याला.... अन् आणली मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजना.... लाडक्या भाचीला न्याय द्यावा...असे गीत गात महिलांनी म्हणजेच लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

धाराशिव तालुक्यातील सोनेगाव येथील महिलांनी मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण योजनेंतर्गत लाभ मिळवून दिल्याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांना मुख्यमंत्र्यांचे पक्ष प्रतिनिधी म्हणून राखी बांधून औक्षण केले. तर मुख्यमंत्री शिंदे यांचे आभार लाडका भाऊ माझा मुख्यमंत्री झाला... लाडक्या बहिणींची काळजी त्याला... अशी अगदी मोजक्या परंतू मनाचा ठाव घेणाऱ्या शब्दात मांडणी करीत गीतातून व्यक्त केले. त्यामुळे रक्ताच्या नात्याने नसली तरी देखील भारतीय संस्कृतीतील मानलेल्या भाऊ-बहिणींचे नाते किती घट्ट असते याची प्रचिती येत आहे. तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गावोगावच्या महिलांच्या किती आवडीची व जिव्हाळ्याची झाली आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव दिसून येत आहे.

# तांदूळवाडी ग्रामसभेत केंद्र व राज्य सरकारच्या निषेधाचा ठराव पारित मालवण पुतळा दुर्घटनेमुळे शिवप्रेमी संतप्त

कळंब दि.३० (प्रतिनिधी) – मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या दुर्घटने प्रकरणी कळंब तालुक्यातील तांदूळवाडी ग्रामपंचायतने ग्रामसभेद्वारे केंद्र व राज्य सरकारच्या निषधाचा ठराव दि.२९ ऑगस्ट रोजी पारित करण्यात आला.

कळंब तालुक्यातील तांदुळवाडी ग्रामपंचायतची ग्रामसभा सुरू असताना ऐनवेळीच्या विषयात मालवण पुतळा दुर्घटना विषय ग्रामस्थांनी उपस्थित करीत संतप्त भावना व्यक्त केल्या. लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सरकारने घाईगडबडीत ३ वर्षात होणारे काम ६ महिन्यांत पूर्ण केले. दि.४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संरक्षण मंत्री राजनाथ



सिंह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सदर पुतळ्याचे अनावरण केले. हा पुतळा जयदीप आपटे या अनुभव नसलेल्या शिल्पकाराकडून उभारला होता. घाईगडबडीत उभारण्यात आलेल्या या पुतळ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होते. देशात गेल्या १०० वर्षांत महाराजांचे शेकडो पुतळे उभारले असून त्यापैकी एकही पुतळा पडला नाही. मात्र मालवण येथील पुतळा केवळ ८ महिन्यांत कोसळला. या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा शिवप्रेमींमधे संशय आहे. याविषयी ग्रामसभेत संतप्त गावकऱ्यांनी एकमताने केंद्र व राज्य सरकारचा निषेध करून शिल्पकार व इतर सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून सरकारने कारवाई करावी असा ठराव मंजूर करण्यात आला. हा ठराव संभाजी ब्रिगेड पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष सतिश भास्करराव काळे यांच्या सुचनेनुसार शशिकांत पाटील यांनी मांडला. नितीन शंकर काळे यांनी अनुमोदन दिले. ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. ही ग्रामसभा सरपंच प्रणित डिकले यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच महावीर ढिकले, वैभव काळे, दत्ता कोल्हे, अभिजीत काळे, आश्रुबा लिमकर, सुशील काळे, माधव पाटील, सुदर्शन काळे, करण डिकले, सुशील काळे, राहुल काळे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडली. ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यासाठी ग्राम पंचायत सदस्य नितीन काळे यांनी विशेष प्रयत्न केले.

# आरटीई निवड प्रक्रियेत सावळागोंधळ, शिक्षण विभागाची डोळेझाक

## डावललेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची हायकोर्टात धाव

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – बालकांचा शिक्षणाचा अधिकार (राईट टू एज्युकेशन) अर्थात आरटीआय निवड प्रक्रियेत धाराशिव जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात सावळागोंधळ माजला असून इन्कम टॅक्स भरणार्या पालकांच्या पाल्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. परंतू याकडे शिक्षण विभागाने सोयीस्कर डोळेझाक केल्यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी थेट हायकोर्टात धाव घेतली आहे. या प्रकरणात न्यायालयाच्या निकालाकडे आरटीईपासून वंचित विद्यार्थ्यांच्या पालकांचे लक्ष वेधले आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रियेत विधवा महिला, अनाथ बालके, दिव्यांग, एससी, एसटी, ओबीसी अशा घटकातील विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक डावलले असल्याचा पालकांचा आरोप आहे. याबाबत शिक्षण विभागाकडे तक्रारीही दाखल करण्यात आलेल्या आहेत. परंतू शिक्षण विभागाने याकडे डोळेझाक केल्यामुळे पालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी यांच्यासमवेत तक्रारदार पालकांची बैठक घेऊन या प्रकरणात तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. मात्र पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही. या प्रवेश प्रक्रियेचे खापर संगणकावर फोडून शिक्षण विभागाचे अधिकारी हात वरत करत आहेत. जर संगणकावरून सर्वकाही होत असेल तर शाळेपासून हाकेच्या अंतरावर असलेला विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत अपात्र कसा ठरतो आणि बाहेरगावचा किंवा शाळेपासून दूर अंतरावर असलेला विद्यार्थी कसा पात्र ठरू शकतो ? नियमाची अंमलबजावणीच होत नसेल तर अंतराची अट कशासाठी ? असा सवालही पालकांमधून केला जात आहे. तसेच इन्कम टॅक्स भरणारे व्यापारी, नोकरदार यांच्या पाल्यांना आरटीईअंतर्गत प्रवेश मिळतोच कसा ? या प्रश्नाचे उत्तर शिक्षण विभागाकडे नाही. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेनेचे शहर संघटक प्रशांत साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. न्यायालय या प्रकरणात काय निकाल देणार ? याची प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नजरा लागल्या आहेत.

# मराठा समाजाच्या वतीने अहमदपूरात सामुहिक वर्षश्राद्ध घालणे व जेलभरो आंदोलन

अहमदपूर दि. ३०(बालाजी कारामुंगीकर) सकल मराठा समाजाच्या वतीने विविध मागण्यांसाठी अहमदपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सर्वपक्षीय मराठा नेत्यांचे सामुहिक श्राद्ध घालणे व जेलभरो आंदोलन करण्यात आले.

सकल मराठा समाजाच्या वतीने श्राद्ध घालणे कार्यक्रमात संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामध्ये गेल्या एक वर्षापासून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून ते ही ५०% च्या आतून आरक्षण मिळावे, यासाठी लोकशाही मार्गाने अनेक वेळा मराठा समाजाच्या वतीने उपोषण केली आहेत. या संपूर्ण वर्षभरामध्ये महाराष्ट्रात विविध मार्गाने आंदोलने केले व अंतरवाली सराटी जि. जालना येथे झालेल्या अमाणूष लाटीचार्ज व गोळीबारस एक वर्ष पूर्ण होऊन सुद्धा महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाच्या कोणत्याच मागण्या मान्य केलेल्या नाहीत. त्याउलट शासनाने आंदोलकावरच खोटे दाखल केले आहेत तसेच आंदोलकावरील गुन्हे मागे घेणे व मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून आरक्षण देण्याचे वचन सरकारने तीन वेळेस दिले होते. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेऊन आरक्षण देण्याचा शब्द दिला होता तो ही पाळला नाही तसेच ४०० वर्षापूर्वी बांधलेले गढकिल्ले आणखीन मजबुत असून ८ महिन्याखाली बसवलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा वाऱ्याने पडला असे बेताल वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करून मोकळे झाले हे अशोभनीय असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील मराठा समाजाचा कोणताही नेता व त्यांच्या पक्ष आरक्षणाच्या बाजूने ठोसाची भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे या सर्वांचा निषेध म्हणून आज २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहमदपूर या ठिकाणी सर्व पक्षीय मराठा नेत्यांचा श्राद्ध घालून आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रा. गोविंद शेळके, प्रा.नाना कदम, प्रा. रोहिदास कदम, प्रा.विनोद माने, शिवशंकर लांडगे , जयराम पवार, देवानंद मुळे आदिंनी यावेळी समाजाच्या वतीने शोक व्यक्त केला. यावेळी यावेळी प्रा. गोविंद शेळके, विजयकुमार बोडके, गणेश पवार, सुनील पवार,माणिक कदम, प्रवीण मुळके, बालाजी कदम जवळगेकर, धनंजय साखरे, श्रीधर तराटे, शिवाजी पाटील, आगलावे, सुनील पाटील, धनराज पाटील , शिवशंकर लांडगे, पिके मुळे, मुकेश पाटील, दत्तात्रय अडसूळ, शैलेश जाधव, शिवाजी पाटील , सतीश नवटके, सिद्धार्थ दापके , राम मुळके, विशाल जाधव, भास्कर जाधव, विजय पवार यांच्यासह असंख्य सकल मराठा समाज बांधव उपस्थिती होता.

वर्षश्राद्ध कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड.आनंद जाधव व सुत्रसंचालन मुकेश पाटील यांनी केले. यावेळी सकल मराठा समाजाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# संपादकीय

## संकटकाळातही अर्थव्यवस्था गतिमान

भारताच्या शेजारील पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या अर्थव्यवस्था संकटात आहेत. म्यानमार, अफगाणिस्तानचा तर विचारच करायला नको. जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या चीनच्या आर्थिक विकासाचा दर घटला आहे. युरोप, अमेरिकेत मंदी आहे. दोन मोठ्या युद्धांचा जगातील अनेक देशांना परिणाम भोगावा लागत आहे. असे असले, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने मात्र वाढीचा वेग कायम ठेवला आहे.

देशात अनियमित मॉन्सून असूनही आर्थिक विकासाचा वेग कायम आहे. अर्थ मंत्रालयाने आर्थिक आढाव्यात जीडीपी ६.५ ते ७ टक्क्यांपर्यंत वाढीचा अंदाज असल्याचे म्हटले आहे. अहवालात अर्थ मंत्रालयाने म्हटले आहे की, जुलैच्या मासिक आर्थिक आढाव्यानुसार, भारतीय अर्थव्यवस्थेने २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्ये आपला वेग कायम ठेवला आहे. त्याचे कारण म्हणजे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात झालेली वाढ. कर आधार, विस्तार आणि आर्थिक क्रियाकलाप वाढीच्या आधारावर हे शक्य झाले. उत्पादन क्षेत्रातील वाढीचे कारण म्हणजे मागणीत वाढ, नवीन निर्यात ऑर्डरमध्ये वाढ तसेच उत्पादन किमतीत वाढ. अर्थ मंत्रालयाच्या या अहवालात म्हटले आहे की, २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाने वित्तीय एकत्रीकरणाचा मार्ग मोकळा केला आहे. मजबूत महसूल संकलन, महसुली खर्चातील शिस्त आणि मजबूत आर्थिक कामगिरी यांच्या पाठिंब्याने वित्तीय तूट कमी होण्याची अपेक्षा आहे. याव्यतिरिक्त, नवीन खासगी गुंतवणुकीच्या चक्राला आधार देत भांडवली खर्च उच्च पातळीवर ठेवला गेला आहे. जुलै २०२४ मध्ये किरकोळ महागाई ३.५ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. ती सप्टेंबर २०१९ पासूनच्या सर्वाधिक नीचांकी आकड्यावर आहे. अन्नधान्याच्या चलनवाढीमध्ये घट झाल्यामुळे हे घडले आहे. नैऋत्य मॉन्सूनच्या स्थिर प्रगतीमुळे खरिपाच्या पेरणीला चालना मिळाली आहे. सध्याच्या खरीप आणि आगामी रब्बी पिकांच्या उत्पादनासाठी जलाशयातील पाण्याची पातळी चांगली आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांमध्ये अन्नधान्य महागाई कमी होण्यास मदत होणार आहे.

अर्थ मंत्रालयाच्या अहवालात म्हटले आहे की, एकंदरीत भारताची आर्थिक गती अबाधित आहे. पावसाळा अनियमित असूनही जलाशयांमधील पाणीपातळी काही प्रमाणात भरून निघाली आहे. पर्चेसिंग मॅनेजर्स इंडेक्स'नुसार उत्पादन आणि सेवाक्षेत्रे वाढत आहेत. विशेषत: अप्रत्यक्ष कर चांगले वाढत आहेत आणि बँक क्रेडिटदेखील वाढत आहे. अहवालानुसार, महागाई कमी होत आहे आणि वस्तू आणि सेवा या दोन्हींची निर्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगली झाली आहे. थेट परकीय गुंतवणुकीत वाढ होत आहे. २०२३-२४ च्या आर्थिक आढाव्यात २०२४-२५ साठी ६.५-७.० टक्के वास्तविक जीडीपी वाढीचा अंदाज वाजवी वाटतो. रेटिंग एजन्सी इक्रा'ने संपूर्ण आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर ६.८ टक्के व्यक्त केला आहे. जो आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये नोंदवलेल्या ८.२ टक्क्यांपेक्षा कमी आहे. सरकारी भांडवली खर्चात घट आणि शहरी ग्राहकांच्या मागणीत घट यामुळे इक्रा'ने आर्थिक वर्ष २०२४-२५च्या पहिल्या तिमाहीमध्ये जीडीपी' सहा टक्क्यांपर्यंत खाली येण्याचा अंदाज वर्तवला आहे. २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीमध्ये जीडीपी दर ७.८ टक्के होता. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून तिमाहीमध्ये संसदीय निवडणुका आणि केंद्र आणि राज्य या दोन्ही स्तरांवर सरकारच्या कमकुवत भांडवली खर्चामुळे काही क्षेत्रांमध्ये तात्पुरती मंदी आली होती.भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ग्राहक आत्मविश्वास सर्वेक्षणानुसार शहरी ग्राहकांच्या आत्मविश्वासात आश्चर्यकारक घट नोंदवली गेली आहे. त्याच वेळी, गेल्या वर्षीच्या प्रतिकूल मॉन्सूनचा परिणाम आणि २०२४ च्या मॉन्सूनची असमान सुरुवात यामुळे ग्रामीण मागणीमध्ये कोणतीही व्यापक सुधारणा झाली नाही. इक्रा'ने २०२४-२५ साठी जीडीपी आणि जीव्हीए (एकूण मूल्यवर्धित) वाढीचा दर अनुक्रमे ६.८ टक्के आणि ६.५ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. भारत आणि आफ्रिकेमध्ये वाहने, कृषी, औषध आणि लॉजिस्टिक्समध्ये व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्याची भरपूर क्षमता आहे. २०२२ मध्ये दोन्ही प्रदेशांमधील द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे आणि २०३० पर्यंत तो दुप्पट म्हणजे २०० अब्ज डॉलर करण्याचे लक्ष्य आहे. ऑटोमोटिव्ह, ग्रो-प्रोसेसिंग, फार्मास्युटिकल्स आणि वाहतूक आणि लॉजिस्टिक्स या क्षेत्रांमध्ये आफ्रिका आणि भारत यांच्यात गुंतवणूक, व्यापार, तंत्रज्ञान आणि क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीने सहकार्याची मोठी क्षमता आहे. भारताची आफ्रिकेला होणारी औषध निर्यात २०२३ मध्ये ३.८ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. या प्रदेशात व्यापार वाढवण्याच्या आणि आफ्रिकन लोकांना स्वस्त औषधे आणि आरोग्य सेवा पुरवण्याच्या संधी आहेत. आफ्रिका हा खनिजांचा प्रमुख पुरवठादार आहे, जे हरित ऊर्जेसाठी महत्त्वाचे आहेत.

## मुलांवर ओरडल्यामुळे मानसिक आरोग्याचा धोका ५०% ने वाढतो

## होतात ५ गंभीर परिणाम



मुलांच्या चुकीच्या वागण्याने पालकांनी नाराज होणे अतिशय सामान्य आहे. परंतु त्यावेळी पालक म्हणून तुम्ही कशी प्रतिक्रिया देता याचा मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर आणि त्यांच्या दीर्घकालीन आरोग्यावर खोलवर परिणाम होतो.

दक्षता ठसाळे-घोसाळकर । णविरींशव: छीं %, २०२३, ०%:५९ झच् खडढ

मुलांवर ओरडल्यामुळे मानसिक आरोग्याचा धोका ५०% ने वाढतो, होतात ५ गंभीर परिणाम

मुलांच संगोपन करत असताना पालक दरवेळी नव्याने काही शिकत असतो. मुलं ऐकत नाही, हट्टी झालीत यामुळे अनेकदा पालक त्यांच्यांवर रागवतात आणि चिडतात देखील. पण अशा पद्धतीने प्रतिसाद देत असताना मुलांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होत असतो. पालक म्हणून तुम्ही मुलांशी कशा पद्धतीने वागता हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. कारण पालकांचं ओरडणं, चिडणं मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतं. लहान मुलांवर आपण जे संस्कार करु तसेच होतात. असं होत असताना पालकांनी मुलांवर ओरडल्याने त्यांच्या मेंदूच्या विकासावर परिणाम होतो. एवढंच नव्हे काही मुलं तर डिप्रेशनमध्ये जातात. त्यामुळे मुलांवर ओरडण्यापूर्वी पालकांनी त्याचे लाँग टर्म साईड इफेक्टस जाणून घ्या.

ओरडल्यामुळे वर्तन बदलते-

तुम्हाला अनेकदा वाटेल की मुलांवर ओरडणे त्या वेळी त्यांचे वाईट वर्तन थांबवते, परंतु संशोधन असे सांगते की, दीर्घकाळात ही समस्या मोठी होते. ओरडण्याने मुलाचे वर्तन बिघडते, कारण प्रत्येक वेळी तुम्हाला पूर्वीपेक्षा जास्त ओरडावे लागते.

ओरडल्यामुळे मेंदूच्या विकासावर परिणाम

ओरडणे आणि इतर कठोर पालकत्व तंत्र मुलाच्या मेंदूच्या विकासाच्या मार्गात बदल करतात. तो चांगल्या माहिती आणि घटनांपेक्षा नकारात्मक गोष्टींवर सहज प्रक्रिया करू लागतो. त्यामुळे पालकांच्या ओरडण्याचा मुलांवर नकारात्मक परिणाम होतो. आणि ही मुलं पालकांपासून थोडी दूर जातात.

ओरडण्यामुळे मुले डिप्रेशनचे शिकार

जेव्हा पालक मुलांवर ओरडतात तेव्हा ते दुखावतात, घाबरतात आणि दुःखी होतात. या भावनिक शोषणाचा थेट संबंध नैराश्य आणि चिंता यांच्याशी असल्याचे संशोधनात म्हटले आहे. त्यामुळे मुलांवर ओरडू नये. मुलं पालकांच्या गोष्टी गांभीर्याने आणि मनाला लावून घेतात. याचा परिणाम त्यांच्यावर खूप होतो.

शारीरिक आरोग्यावर परिणाम

मुलांवर ओरडल्यामुळे जो ताण येतो, त्यामुळे पुढे ते अनेक प्रकारच्या शारीरिक आरोग्याच्या समस्यांना बळी पडतात. मुलं पालकांच्या ओरडण्याचा खूप खोलवर विचार करतात. यामुळे त्यांच्या मनावर आणि शरीरावर परिणाम होतो. मुलं कमी जेवतात. फार विचार करतात.

ओरडण्यामुळे मुलांना तीव्र वेदना होतात.

एका संशोधनानुसार, मुलांवर ओरडणे आणि भविष्यात तीव्र वेदना यांचा खालवर संबंध आहे. विशेषतः संधिवात, पाठ आणि मानेच्या समस्या. मुलांवर रागावल्याने त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. याचा परिणाम त्यांच्या भविष्यावर होत असतो.

फोटोत दिसणारी ही आकृती म्यूझियम ऑफ फ्यूचर म्हणजेच भविष्याचे संग्रहालय आहे. दुबईत बनणाऱ्या यी इमारतीचे फ्रेमवर्क आयातकार २४०० स्टीलच्या रॉडपासून तयार करण्यात आले आहे. हा ढांचा मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये तयार करण्यात आलेला आहे. तेव्हापासून ते आतापर्यंत या ढाच्यावर केवळ पॅनेल लावण्याचे काम सुरू आहे. हे संग्रहालय एक वर्षात सुरू होणार आहे. ही इमारत बनविणाऱ्यांना विश्वास आहे की, ऑक्टोंबर २०२० पर्यंत हे संग्रहालय लोकांसाठी सुरू होईल. त्याच वेळी दुबईत वर्ल्ड एक्स्पो होणार आहे.

म्यूझियम ऑफ फ्यूचरचे कार्यकारी संचालक लॅथ कार्सलन सांगतात की, या इमारतीचा आकार डोळ्यांप्रमाणे आहे. ही बिल्डिंग तयार करण्याचा कॉन्ट्रॅक्ट २०१५ मध्ये दुबईच्या किला डिझाईन कंपनीला मिळाला होता. दुबईमध्ये शेकडो इमारती आहेत, मात्र म्यूझियम ऑफ फ्यूचर एकदम हटके आहे.

म्यूझियम ऑफ फ्यूचरचे वैशिष्ट्य –

याच्या ढाच्याच्या वरती जे पॅनेल लावण्यात आलेले आहेत. त्यावर अरबी भाषेत काहीतरी लिहिण्यात आलेले आहे. मात्र अधिकृतरित्या यावर काय लिहिण्यात आलेले आहे हे सांगण्यात आलेले नाही. शक्यता आहे की, यावर दुबईचे शासक शेह मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी लिहिलेल्या कविता असतील. या संग्रहालयाची उंची ७८ मीटर आहे. यामध्ये प्रकाश यावा यासाठी चौदा किमी लांब एलईडी लाईटस लावण्यात येणार आहे.

हाताने लिहिण्यात आलेल्या या कविता आणि या इमारतीच्या आकारने निर्मात्यांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. प्रत्येक स्टील फ्रेम, पॅनेल विशेष आकारतच कापले जात आहे. ब्रिटनची ब्यूरोहॅपोल्ड इंजिनिअरिंग कंपनी ही इमारत बनविणारी प्रमुख सल्लागार कंपनी आहे. या इमारतीचे डिझाईन बिल्डिंग इंफॉर्मेशन मॉडेलिंगद्वारे तयार करण्यात आले आहे. हे डिझाईन आर्टिफिशियल इंटेलिजेंसीद्वारे तयार केले जाते. जेणेकरून प्रत्येक ठिकाणी एक विशेष गोलाकाराचा अंदाज घेता येईल.

ब्यूरोहॅपोल्ड इंजिनिअरिंगचे टोबाइस बॉली सांगतात की, रेखाचित्राद्वारे हे डिझाईन तयार करणे शक्य नाही. आम्हाला प्रत्येक गोष्ट डिजिटल पद्धतीने करायची होती. तंत्रज्ञानाच्या मदतीनेच एवढ्या सहज पद्धतीने आम्ही निर्मिती करू शकतो.

सुरूवातीला प्रोजेक्ट डायरेक्टरने बिल्डिंगचे २डी मॉडेल तयार केले. छोटे छोटे बदल करण्यासाठी देखील कॉम्प्यूटरची मदत घ्यावी लागली. मशीनच्या मदतीनेच स्टीलची फ्रेम तयार करण्यात आली. कॉम्प्यूटर डिझाईनवर आर्टिफिशियल इंटेलिजेंसद्वारेच काम करण्यात आले.

अडचण अशी होती की, इमारतीचे जे डिझाईन होते, त्यामध्ये फीट बसणारा कोणताही स्टीलचा ढाचा नव्हता. यासाठी इंजिनिअर्सनी स्वत:चेच एल्गोरिद्म लिहिले. त्यामुळे इंजिनिअर्सना स्वत:च्या गरजेनुसार स्टीलला बदलावे लागले नाही. कॉम्प्यूटरवर डिझाईन तयार केल्याने ढाचा उभा करताना स्टीलचा एक देखील तुकडा कापावा लागला नाही. थ्री-डी मॉडेलिंगच्या मदतीने इमारतीच्या आतील पाण्याचा प्रभाव आणि इलेक्ट्रिक वायरिंगची डिझाईन देखील अतिशय काळजीपुर्वक करण्यात आली. आता इमारतीचा ७० टक्के ढाचा पुर्ण झालेला आहे. सात मजली इमारतीवर अरबी भाषेत लिहिलेले पॅनेल

## म्युझियम ऑफ फ्यूचर का बनत आहे कुतूहलाचा विषय ?



लावले जात आहेत. एकूण १०२४ पॅनेल लावले जाणार आहेत. प्रत्येक पॅनेलला खास इमारतीसाठी तयार करण्यात आले आहे. इमारत बनवताना एअर कंडिशनिंग आणि प्रकाशाची देखील काळजी घेण्यात आलेली आहे. त्यामुळे इमारतीला थ्एए प्लेटिनम रेटिंग मिळाली आहे. येथे येणाऱ्या इलेक्ट्रिक गाड्यांना चार्ज करता येईल. याशिवाय बिल्डिंगमध्ये सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी आहे. दरवर्षी १० लाख पर्यटक म्यूझियम ऑफ फ्यूचरला भेट देतील अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

## महिलांच्या शरीरात असे काय वेगळे असते की ज्यामुळे त्यांना दाढी आणि मिशी येत नाही? घ्या जाणून

मनुष्य जीव हा इतर प्राण्यांच्या तुलनेत विशेष आहे. त्यांच्याकडे विचार करण्याची क्षमता आहे,समजण्याची ताकद आहे. तसेच कोणत्याही विषयावर आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. हे गुण प्रत्येक मनुष्यामध्ये असतात. मात्र देवाने महिला आणि पुरुषांच्या शरीरात असे काही बदल केले आहेत जे दोघांमध्ये वेगवेगळे आहेत. तुमच्या डोक्यात आता असा सवाल आला असेल की जसे पुरुषांच्या चेहऱ्यावर दाढी असते तसे महिलांना का नसते. महिलाही एक माणूस आहे मग त्यांना मिशी का येत नाही जाणून घेऊया

**काय आहे कारण?**

पुरुषांमध्येडायहायड्रोटेस्टोस्टीरॉन नावाचे एन्झाईम असते ज्यामुळे त्यांचे हेअर फॉलिकल उत्तेजित होतात आणि त्यांना दाढी येते. महिलांमध्ये हे एन्झाईम आढळत नाही. महिलांच्या यौन ग्रंथी एस्ट्रोजन नावाचे हार्मोन निर्माण करतात. एस्ट्रोजनमुळे मुलींच्या शरीरात बदल होतात. त्यानंतर ती मुलगी किशोरावस्थेमध्ये प्रवेश करते. महिलांमध्ये सेक्स हार्मोन पुरुष हार्मोनच्या उलट काम करतात. महिलांच्या शरीरात मेल हार्मोन वाढल्यास अथवा फीमेल हार्मोन कमी झाल्यास दोन्ही हार्मोनमधील बॅलन्स बिघडतो. या कारणामुळे नको त्या जागेवर केस उगवतात.

**पुरुषांमध्येही दिसतात बदल**

झउजड (पॉलीसिस्टिक ओवरी सिंड्रोम), झउजऊ(पॉलिसिस्टिक ओव्हरियन डिसीज) आणि हार्मोनल असंतुलन अशी काही कारणे आहेत ज्यामुळे महिलांना केस येत नाही. तसेच एंड्रोजन नावाचे हार्मोन पुरुषांमध्ये दाढी-मिशी येण्याचे कारण बनतात. यामुळे शरीरात काही बदल होतात.



## नाकात बोट घालण्याची सवय तुम्हाला बनवू शकते केमिकल लोच्याचा शिकार, जाणून घ्या कसे



काही लोकांना नाकात बोट घालायची इतकी सवय असते की ते लोकांसमोरही हे कृत्य करण्याची चूक करतात. यामुळे अनेकवेळा लाज वाटते, पण तरीही लोक ही सवय लावून घेतात. याला ारहळपींळश्रश्रशु-ारपळर असेही म्हणतात, जे काही गुप्तपणे करतात आणि अनेक समोर. तुम्हाला माहिती आहे का की या वाईट सवयीचा आपल्या मेंदूच्या आरोग्यावरही परिणाम होतो. एक संशोधन समोर आले आहे ज्यानुसार नाकात बोट घालण्याच्या सवयीमुळे अल्झायमरचा आजार होऊ शकतो.

नाकात बोट घातल्याने विस्मरण कसे होऊ शकते? ऑस्ट्रेलियाच्या ग्रिफिथ विद्यापीठात उंदरांवर केलेल्या संशोधनात हा परिणाम समोर आला आहे. हा अभ्यास २०२२ मध्ये पूर्ण झाला आणि क्लॅमिडीया न्यूमोनिया बॅक्टेरियावर संशोधन करण्यात आले. या जीवाणूमुळे न्यूमोनिया होतो. या जीवाणूमुळे स्मृतिभ्रंश होऊ शकतो, असे संशोधनातून दिसून आले आहे. ते नाकातून थेट मेंदूपर्यंत जाऊ शकते आणि मेंदूमध्ये जाऊन अल्झायमर आणि स्मृतिभ्रंश सारखे आजार होऊ शकतात. या जीवाणूमुळे मज्जातंतूंचा संसर्गही होऊ शकतो.

बॅक्टेरियाचा हल्ला रोखणारे अमायलोइड प्रोटीनही या काळात मेंदूमध्ये मोठ्या प्रमाणात तयार होते. ग्रिफिथ युनिव्हर्सिटीचे न्यूरोसायंटिस्ट जेम्स सेंट जॉन म्हणतात की क्लॅमिडीया न्यूमोनिया थेट नाक आणि मेंदूपर्यंत जाऊ शकतो हे आम्ही प्रथमच दाखवले आहे. यामुळे शरीरात अल्झायमरसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

संशोधकांच्या मते, नाकात बोट घालण्याच्या सवयीमुळे आतील थर सोलू शकतो. अशा स्थितीत बॅक्टेरिया मेंदूपर्यंत पोहोचू शकतात आणि ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. एवढेच नाही तर अल्झायमरही सुरू होऊ शकतो.

संशोधक सेंट जॉन सांगतात की, हा अभ्यास आपल्याला माणसांवरही करायचा आहे आणि ही प्रक्रिया अशीच चालावी अशी आमची इच्छा आहे. संशोधकांचे म्हणणे आहे की हा जीवाणू मानवांमध्ये आहे, परंतु ते मानवापर्यंत कसे पोहोचले हे शोधू शकले नाहीत. शींीीी नाकातून बोट बाहेर काढ...नाकात नको बोट घालू...आपण अनेकदा नाकात बोटं घालताना कोणाला पाहिलं की आपल्या तोंडून हेच शब्द बाहेर पडतात. पण नाकात बोट घालणे किती महागात पडू शकते हे तुम्हाला माहितेय का?

णविरींशव: गरप २३, २०२३, ०३:५९ झच् खडढ

ऋळपसशी ळप छीश डळवश एषषशलीं : तुम्हालाही नाकात बोट घालण्याची सवय आहे? मग पडू शकते महागात ेिंळींश्रश=

ऋळपसशी ळप छीश डळवश एषषशलीं : हल्ली नाकात बोट घालण्याची सवय लहानांपासून ते मोठ्यापर्यंत प्रत्येकाला असते. पण नाकात सतत बोटे घालणे ही सामान्य समस्या नाही. या सवयी कधीही कुठे सुरु होतात. ज्या लोकांना या सवयी असतात त्यांना सर्वांसमोर हसू झाल्याशिवाय राहात नाही. परंतु तुम्हाला माहित आहे का ? नाकात बोट घालणे किती महागात पडू शकते? या सवयीमुळे गंभीर आजारा सामोरे जावे लागू शकते.

नाकात बोट घालण्याची सवय असलेल्यांना अल्झायमर किंवा डिमेन्शिया होण्याचा धोका आहे, असं संशोधकांचे म्हणणे आहे. अल्झायमर हा मेंदूशी संबधित आजार आहे.यात स्मरणशक्ती कमकुवत होते किंवा पूर्णत: संपुष्टात येते. या आजारामुळे विचार आणि आकलनावर परिणाम होतो. हा आजार गंभीर स्वरूपाचा असेल तर संबंधित रूग्णाला त्याची दिनचर्या करणंदेखील अवघड होते. ६०-६५ या वयात हा आजार होण्याचे प्रमाण अधिक आहे.

## राशी भविष्य



३१ ऑगस्ट २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

वृषभ : शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर
शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा.

मिथुन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.अनावश्यक खरेदी होईल.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

कन्या : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामान्य राहील.

तुळ : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल. जोखमीचे कामे करू नका.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका. ईश्वराविषयी श्रद्धा वाढेल.

धनु : शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा:दक्षिण
सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल. दिखाव्यापासून दूर रहा. व्यापारात, नोकरीत लाभदायक योग आहे.

मकर: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामान्य राहील.

कुंभ : शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व
महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

मीन : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता असून उत्पन व खर्च बरोबरीने राहील.

८ नोव्हेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर शनी व मंगळाचा प्रभाव आहे. लोकांशी बऱ्याचवेळा जमवून घेणे तुम्हाला कठीण जाते. उगाच भांडत बसण्यापेक्षा नमते घेणे तुम्ही अधिक पसंत करता. पण वेळ आल्यावर आपल्या अपमानाचा जरूर वचपा काढता. तुम्ही दूरदर्शी आहात. आपल्या निर्णयाचे भविष्यात काय परिणाम होतील याचा पूर्ण विचार करूनच तुम्ही कृती करता. एकदा ठरविलेले ध्येय हस्तगत होईपर्यंत तुम्ही जिद्दीने, चिकाटीने, सातत्याने त्याचा पाठपुरावा करता. चेष्टामस्करीपेक्षा आपल्या कामाला महत्व देता.

तुमच्या काटकसरी वृत्तीमुळे लोक तुम्हाला कंजूष समजतात. पण वेळप्रसंगी मोठा त्याग करण्याची तुमची तयारी असते. एकलकोंडेपणा टाळून लोकांत मिसळायला शिका. थंड पेये, वातानुकूलित व्यवस्था, आंबट पदार्थ यांचा वापर टाळा. नाहीतर सांधेदुखी, पाठदुखीसारखे विकार होतील.

कार्यक्षेत्र : निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करण्याच्या वृत्तीमुळे तुम्ही लवकरच वरिष्ठांची मर्जी संपादन करता. फिरतीची नोकरी किंवा स्वतंत्र व्यवसायाच्या फंदात पडू नका. प्रशासकीय व व्यवस्थापक सेवेत तुमचा लवकर उत्कर्ष होईल. पोलाद, खनिज तेले, ऊर्जाप्रकल्प, बांधकाम साहित्य, चामड्याच्या वस्तू यांच्या कंपन्यात वा कारखान्यात उत्कर्ष होण्याची शक्यता जास्त आहे.

प्रणयी जीवन : आर्थिक दृष्ट्या ास्थिरस्थावर झाल्याखेरीज तुम्ही विवाहाचा विचार करीत नाही. स्थळांची जास्त चिकित्सा करीत बसल्यानेही विवाह लांबणीवर पडतात. जुन्या रूढी, पतिव्रत्य, एकनिष्ठा यांना तुम्ही महत्व देता. आधुनिक, स्वैर वृत्तीची माणसे तुम्हाला नको असतात. जानेवारी २० ते फेब्रुवारी १८ मधील व्यक्तिं टाळा. सप्टेंबर २३ ते ऑक्टोबर २२ मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : विरोधी गटातील लोकांच्या छुप्या कारवाया चालू राहतील. त्यांचे डावपेच ओळखून मुकाबला करा. डिसेंबर जानेवारी मध्ये व्यवसायानिमित्त दौरे, प्रवास होतील. मार्च एप्रिल मध्ये तरूण पिढीच्या विचारांशी संवाद साधाल. मे जून मध्ये कार्यालयात आपले आसन बळकट कराल. जुलै ऑगस्ट मध्ये धडाडीने नवे प्रकल्प उभे कराल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये मुलांची प्रगती समाधानकारक ठरेल.

महत्वाचे वर्ष : ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१.

भाग्यरत्न : नीलम

याच तारखेची व्यक्ती : पु. ल. देशपांडे, लालकृष्ण अडवाणी

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# मराठा समाजाच्या वतीने अहमदपूरात सामुहिक वर्षश्राद्ध घालणे व जेलभरो आंदोलन




अहमदपूर दि. ३०(बालाजी कारामुंगीकर) सकल मराठा समाजाच्या वतीने विविध मागण्यांसाठी अहमदपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सर्वपक्षीय मराठा नेत्यांचे सामुहिक श्राद्ध घालणे व जेलभरो आंदोलन करण्यात आले.

सकल मराठा समाजाच्या वतीने श्राद्ध घालणे कार्यक्रमात संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामध्ये गेल्या एक वर्षापासून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून ते ही ५०% च्या आतून आरक्षण मिळावे, यासाठी लोकशाही मार्गाने अनेक वेळा मराठा समाजाच्या वतीने उपोषण केली आहेत. या संपूर्ण वर्षभरामध्ये महाराष्ट्रात विविध मार्गाने आंदोलने केले व अंतरवाली सराटी जि. जालना येथे झालेल्या अमाणूष लाटीचार्ज व गोळीबारस एक वर्ष पूर्ण होऊन सुद्धा महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाच्या कोणत्याच मागण्या मान्य केलेल्या नाहीत. त्याउलट शासनाने आंदोलकावरच खोटे दाखल केले आहेत तसेच आंदोलकावरील गुन्हे मागे घेणे व मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून आरक्षण देण्याचे वचन सरकारने तीन वेळेस दिले होते. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेऊन आरक्षण देण्याचा शब्द दिला होता तो ही पाळला नाही तसेच ४०० वर्षापूर्वी बांधलेले गढकिल्ले आणखीन मजबुत असून ८ महिन्याखाली बसवलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा वाऱ्याने पडला असे बेताल वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करून मोकळे झाले हे अशोभनीय असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील मराठा समाजाचा कोणताही नेता व त्यांच्या पक्ष आरक्षणाच्या बाजूने ठोसाची भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे या सर्वांचा निषेध म्हणून आज २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहमदपूर या ठिकाणी सर्व पक्षीय मराठा नेत्यांचा श्राद्ध घालून आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रा. गोविंद शेळके, प्रा.नाना कदम, प्रा. रोहिदास कदम, प्रा.विनोद माने, शिवशंकर लांडगे , जयराम पवार, देवानंद मुळे आदिंनी यावेळी समाजाच्या वतीने शोक व्यक्त केला. यावेळी यावेळी प्रा. गोविंद शेळके, विजयकुमार बोडके, गणेश पवार, सुनील पवार,माणिक कदम, प्रवीण मुळके, बालाजी कदम जवळगेकर, धनंजय साखरे, श्रीधर तराटे, शिवाजी पाटील, आगलावे, सुनील पाटील, धनराज पाटील , शिवशंकर लांडगे, पिके मुळे, मुकेश पाटील, दत्तात्रय अडसूळ, शैलेश जाधव, शिवाजी पाटील , सतीश नवटके, सिद्धार्थ दापके , राम मुळके, विशाल जाधव, भास्कर जाधव, विजय पवार यांच्यासह असंख्य सकल मराठा समाज बांधव उपस्थिती होता.

वर्षश्राद्ध कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड.आनंद जाधव व सुत्रसंचालन मुकेश पाटील यांनी केले. यावेळी सकल मराठा समाजाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरून

### गत १० वर्षांत...

पूर्वीच्या काळी कॅश इज किंग म्हटले जायचे. पण आजघडीला जगातील अर्ध्याहून अधिक रियल टाईम डिजिटल व्यवहार भारतात होतात. संपूर्ण जगात भारताचा युपीआय हे फिनटेकचे मोठे उदाहरण आहे. आज शहरात किंवा गावात कोणताही ऋतू असतो, भारतातील बँकिंग सर्व्हिस २४ तास सुरु असते. कोरोनासारख्या संकटकाळातही भारत हा बँकिंग व्यवस्था सुरळीत असणा-या मोजक्या देशांपैकी एक होता. जनधन बँक खाती हे महिला सबलीकरणाचे माध्यम झाले आहे. त्यामुळे महिलांना बचत आणि गुंतवणुकीचा पर्याय उपलब्ध झाला. मुद्रा योजनेच्या माध्यमातून तब्बल २७ ट्रिलियनची कर्जे देण्यात आली, याच्या ७० टक्के लाभार्थी या महिला आहेत, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

### महाराजांच्या...

या प्रकरणात आता पुतळा नेव्हीने की पीडब्ल्यूडीने बांधला यावर वाद घालण्यात अर्थ नाही. पहिल्यांदा या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे. पुन्हा या ठिकाणी भव्य पुतळा उभा राहिला पाहिजे, यासाठी सरकारने लक्ष घातले आहे असेही अजित पवार म्हणाले. ठाकरे गट आणि राणे समर्थकांमध्ये झालेल्या गोंधळावर बोलताना पवार म्हणाले, प्रत्येक राजकीय पक्षांनी तारतम्य ठेवले पेहिजे, तिथल्या नेत्यांनी तारतम्य ठेवले पाहिजे. कार्यकर्त्यांनी उत्साहाच्या भरात काहीही करता कामा नये. ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती नाही. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती जी आहे. त्या प्रकारे आपण वागले पाहिजे, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.

### भारताच्या...

स्थान पटकावले आणि तिला कांस्य पदक मिळाले. दक्षिण कोरियाच्या युनरी लीने २४६.८ गुण मिळवत रौप्य पदक पटकावले.

### शरद पवारांनी...

झेड प्लस सुरक्षेची गरज नसल्याचे शरद पवार यांनी या अधिका-यांना सांगितल्याचे कळते आहे. शरद पवारांच्या सुरक्षेचा मुद्दा हा गेल्या दोन दिवसांपासून चर्चेत आहे.

सुळेंनीही केली होती विनंती

बदलापूर इथे घडलेल्या शाळेतील चिमुकल्या मुलींवरील अत्याचाराच्या घटनेनंतर पवारांच्या कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली होती की, माझी सुरक्षा व्यवस्था काढून घ्या. कारण राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडत चालली आहे. पोलिसांवर प्रचंड ताण आहे, त्यामुळे माझी सुरक्षा व्यवस्था तातडीने काढून घेण्यात यावी.

### महिला...

बचत गटांच्या पाठीशी असून गटांनी कर्जाचा उपयोग व्यवसायासाठी करण्याचे आवाहन केले. श्री. सरिगाला यांनीही मनोगत व्यक्त केले. श्री. अमर सिंह यांनी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत जिल्ह्यातील बचत गटांना तीस कोटी कर्ज वाटप झाले असून त्यातील ३८ टक्के वाटप एकट्या बँकेने करून केले असून वर्षाअखेरपर्यंत बँक ७० टक्के कर्ज वाटपाचे उद्दिष्ट गाठेल, असा विश्र्वास व्यक्त केला. या वेळी बँकेच्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) फंडातून दहा गरजू महिलांना शिलाई मशीन तसेच पाच दिव्यांग व्यक्तींना व्हीलचेयर वाटप करण्यात आले. या वेळी जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक प्रमोद शिंदे, प्रबंधक महेश कदम यांच्याह बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अपूर्वा म्हस्के यांनी सुत्रसंचालन केले. उमेश अडगावकर यांनी आभार मानले.

### मोना अग्रवालने...

रायफल प्रोन आर ६ आणि महिला ५० मीटर रायफल ३ पोझीशन आर ८ मध्येही भारताचे प्रतिनिधीत्व करताना दिसेल.

### राज्यात २...

२ सप्टेंबरपासून मुसळधार पावसाला सुरुवात होणार आहे. तर तो पाऊस ६ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. पावसाची सुरुवात विदर्भातून होणार आहे. या पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन ते पाणी जायकवाडी धरणात येणार आहे. सध्या जायकवाडी धरण ७० टक्के भरले असून २ ते ३ दिवसांत ते ८० टक्केच्या वर जाणार असून सप्टेंबर महिन्यात शंभर टक्के भरणार आहे. त्यानंतर पाण्याचा विसर्ग करावा लागणार आहे. धरणाखाली असलेले दहा ते बारा बंधारे या मुसळधार पावसाने भरणार असल्याचे ही पंजाब डख यांनी सांगितले आहे.

पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार

सप्टेंबरमध्ये होणा-या पावसामुळे सोयाबीन, मका, कापूस यासारख्या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे. तर जमिनीत ओलावा राहून खरीप हंगामातील गहू, हरभरा या पिकांना त्याचा फायदा होऊ शकतो. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा देशात आतापर्यंत ७ टक्के पाऊस अधिक झाला आहे.

बहुतांश जिल्ह्यात पाऊस

गेल्या काही दिवसापासून राज्यात चांगला पाऊस होत आहे. बहुतांश जिल्ह्यात चांगला पाऊस झाला आहे. आजही राज्याच्या विविध भागात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आजही पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्याला देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याचबरोबर संपूर्ण विदर्भात देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना देखील पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. आज या भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे या पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी असे अवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### निवळी येथील...

महाविकास आघाडी सत्तेवर येताच बंद केल्या. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आल्याने लाडकी बहीण यासह अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत या योजना पुढील काळात चालू ठेवण्यासाठी पुन्हा महायुती सत्तेवर येणे गरजेचे आहे असे आ्. कराड यांनी बोलून दाखविले.

निळकंठेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्र विकासाचा ङ्गबफदर्जा मिळवून दिला दोन कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला भविष्यात आणखी तीन कोटी रुपये मंजूर करून घेवू. उसाच्या टिपऱ्याचे राजकारण यापुढील काळात चालू देणार नाही असे सांगून आपल्या कष्टाचा घामाचा मोबदला मिळत नसेल तर शेतकऱ्यांनीही सक्षम झाले पाहिजे. एफ. आर. पी. प्रमाणे भाव देण्याचे मोदी सरकारने बंधन घातल्यापासून मांजरा परिवाराची रिकव्हरी का कमी झाली, पाण्यात बदल आहे का उसात बदल झाला आहे असा प्रश्न उपस्थित करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, इतर अनेक कारखान्यापेक्षा निवळीसह मांजरा कारखान्याने भाव का कमी दिला पुन्हा त्यात मशीन तोडणी कपात, वजन काट्यावर पाप केले जाते आपल्या न्याय हक्कासाठी शांत राहून चालणार नाही. संघटीत शक्तीतून संघर्ष करावा लागेल.

प्रारंभी सुरज शिंदे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून झालेल्या विविध विकास कामांची माहिती देऊन जोतिबा मंदिरास तिर्थक्षेत्र विकासाचा ङ्गबफ दर्जा मिळवून द्यावा आणि निवळी गावाचा पोखरा योजनेत समावेश करावा अशी मागणी केली. यावेळी बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, मारुती माने, विकास शिंदे, मंगेश शिंदे, उद्धव मांयदे, बालाजी गायकवाड, रोहित शिंदे, सुनील मोरे, बालाजी सगर, बिबीशन हिंगले, उद्धव रसाळ, नवनाथ मायंदे, रामलिंग विभुते, महादेव शिंदे, नवनाथ माने, विलास रसाळ, भारत सव्वाशे, बिभीषण मायंदे, गुणवंत पांचाळ, सागर रसाळ, यादव रसाळ, नवनाथ माने, कमलाकर माने, बाबा माने, रमेश ढोकळे, विठ्ठल शिरसागर यांच्यासह महिला पुरुष मोठ्या संख्येने होते.

# तळागाळातील व्यक्तींचा विकास हाच खरा शाश्वत विकास:डॉ. प्रवीण सप्तर्षी

देगलूर (प्रतिनिधी) : सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे, तथापि वेगात बदलत जाणारे तंत्रज्ञान म्हणजे विकास नसून सर्वसामान्य, तळागाळातील व्यक्तींना त्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी पूरक ठरणारा विकास हाच खऱ्या अर्थाने शाश्वत विकास असतो, असे मत सैलिसबरी विद्यापीठ यू.एस.ए. येथील अतिथी प्रा. डॉ. प्रवीण सप्तर्षी यांनी व्यक्त केले. वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील भूगोल व आय.क्यू.ए.सी. विभाग आणि ग्लोबल फाउंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्र्वत विकास विषयक कल्पना या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय ई-परिषदेत बीजभाषक म्हणून ते मार्गदर्शन करत होते. यावेळी मुक्ताई प्रतिष्ठान देगलूर चे सचिव मा. राजेश महाराज देगलूरकर, अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, भूगोल विभाग प्रमुख डॉ. भीमराव माळगे, डॉ. आनंद वळंकीकर यांची ऑनलाईन उपस्थिती होती. प्रथम वै. धुंडा महाराज देगलूरकर यांच्या प्रतिमेचे प्राचार्यांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. प्रवीण सप्तर्षी म्हणाले की, जागतिक पातळीवर वाढलेली शस्त्रास्त्र स्पर्धा, अणुबॉम्बची निर्मिती व त्यात होणारी वृद्धी इत्यादी बाबी शाश्र्वत विकासाच्या मार्गातील अडसर ठरणाऱ्या बाबी आहेत तसेच बहुसंख्य नागरिकांची दैनंदिन शुद्ध पाण्याची निकड जर पूर्ण होत नसेल तर विश्र्वगुरू, किंवा डिजिटल इंडिया यासारख्या गप्पा ही फसव्या ठरणाऱ्या आहेत. महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून सेंद्रिय खत निर्मितीचे व शाश्र्वत विकासास पूरक ठरणारे प्रकल्प राबवण्याचे आवाहन ही या प्रसंगी डॉ. सप्तर्षी यांनी उपस्थितांना केले. या आंतरराष्ट्रीय ई-परिषदेत साधन व्यक्ती म्हणून ऑनलाईन उपस्थित असणारे श्रीलंकेतील केलेनिया विद्यापीठातील प्रो. ए. जी. अमरशिंगे म्हणाले की, भारत - श्रीलंकेतील समान धार्मिक परंपरेतून दोन्ही देशात उदयास आलेल्या पर्यटन व्यवसायातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी या शाश्र्वत विकासाला पूरक ठरणाऱ्या आहेत. आसाम रॉयल ग्लोबल विद्यापीठ गुवाहाटी येथून ऑनलाईन उपस्थित असलेल्या डॉ. तुष्टी शर्मा यांनी, वाचन संवर्धन व वाचन संस्कार या प्रक्रियेतून होणारी विकासात्मक वाटचाल यावर भाष्य केले. कौटुंबिक ग्रंथ मंडळ (बुक क्लब) च्या माध्यमातून विविध कुटुंबात ग्रंथांची देवाघेवाण करण्याची आवश्यकता ही त्यांनी यावेळी प्रतिपादन केली. डॉ. सुभाष करंडे (सातारा), डॉ. अनिल येडगे (सोलापूर), डॉ. प्रकाश रोडिया (लातूर), यांनी विविध क्षेत्रात शाश्र्वत विकासाच्या अनुषंगाने सत्राध्यक्षीय मनोगते व्यक्त केली. मानवी जीवनासाठी नैसर्गिक साधन संपत्ती महत्त्वपूर्ण असून ती पुढील पिढीसाठी जतन करणे आवश्यक आहे, त्यामुळे नैसर्गिक साधनांचा अतिवापर टाळला पाहिजे तसेच शक्य होईल तेवढ्या प्रमाणात विविध वस्तूंचा पुनर्वापर केला पाहिजे, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके यांनी समारोप समारंभ प्रसंगी व्यक्त केले. महाविद्यालयाचे सचिव मा. राजेश महाराज देगलूरकर यांनी विविध संत वचनात प्रतिपादन केलेला शाश्र्वत विकासाचा विचार आपल्या शुभेच्छा संदेशातून कथन केला. या आंतरराष्ट्रीय ई- परिषदेच्या निमित्ताने होणारे वैचारिक मंथन, बौद्धिक जागरण हे नक्कीच शाश्र्वत विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा आशावाद प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी व्यक्त केला. या ई-परिषदेत एकूण १९३ सदस्यांची नोंदणी झाली तर १५७ शोधनिबंध प्राप्त झाले. चार वेगवेगळ्या सत्रात गुगल लिंक वर समांतर पद्धतीने देश विदेशातील एकूण ७० पेक्षा अधिक संशोधकांनी शोधनिबंधाचे वाचन केले. भूगोल विभाग प्रमुख डॉ. भीमराव माळगे यांनी प्रास्ताविकातून या ई-परिषदेचा उद्देश व व्याप्ती कथन केली. प्रमुख पाहुण्यांचा सत्रनिहाय परिचय डॉ. सदानंद ऐताल व प्रा. विवेक ठावरे यांनी करून दिला. या ई-परिषदेत सिस्टिम एक्स्पर्ट म्हणून डॉ. भास्कर कोशीडगेवार, प्रा. बालाजी पाटील, श्री. सुदर्शन ससर यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजीवनी नेरकर व प्रा. दिलीप पस्तापुरे यांनी केले तर सत्रनिहाय आभार डॉ. आनंद वळंकीकर आणि डॉ. आनंद अतनुरकर यांनी मानले. परिषद यशस्वी करण्यासाठी भूगोल विभाग प्रमुख डॉ. भीमराव माळगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने या ई-परिषदेचा समारोप समारंभ संपन्न झाला.

## ग्राम पंचायत कार्यालय निडेबन ता.उदगीर जि.लातूर

### जाहीर प्रगटन

तमाम नागरिकांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, निडेबन ग्राम पंचायत हद्दितील खालल प्लॉट मालकांनी/घर मालकांनी आपल्या प्लॉटची/घराचे नामांतर होण्यासाठी आवश्यक पुरावा आणि दस्तऐवज दाखल केल्याने खालील प्लॉटच्या, घरच्या मालकी हक्काबाबत इतर कोणाचे हक्क संबंध हरकती असतील तर आजपासुन पुढील १५ दिवसापर्यंत सबळ पुराव्यासह ग्राम पंचायत कार्यालय, निडेबन येथे हरकती सादर कराव्यात ज्या प्लॉटच्या/घरच्या संदर्भात तक्रारी/हरकती नाही त्यांची नोंद/फेरफार कायदेशिरित्या मुदतीनंतर केले जाईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. म्हणून हे जाहीर प्रगटन देत आहोत कृपया संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहुन देणार | वर्णन | | चतु:र्सिमा | | ख.ख.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माधव शेषराव जोंधळे | जयकुमार उर्फ विजयकुमार हणमंत | स.नं. | ११३/१ | पु. | प्लॉट नं.११५ | ४४११/२०२४ | |
| | | कड्याळकर | प्लॉट नं. | ११४ | प. | प्लॉट नं.११३ | | |
| | | | पु.प. | ३२' | द. | प्लॉट नं.१२१ | | |
| | | | द.उ | ५०' | उ. | ४.५७ मी रोड | | |
| | | | एकुण क्षेत्र | १६००' | | | | |
| | | | ग्रा.पं.नं. | ४३५१ | | | | |

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहुन देणार | वर्णन | | चतु:र्सिमा | | ख.ख.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रणिता रणविर पवार | शिवाजी नरसिंगराव पाटील | स.नं. | ७७/२ | पु. | ९ मी रोड | ४०३३/२०२४ | |
| | | | प्लॉट नं. | ७९ | प. | प्लॉट नं.८४ | | |
| | | | पु.प. | १२.१९ मी | द. | प्लॉट नं.७८ | | |
| | | | द.उ | ८.२७ मी | उ. | प्लॉट नं.८० | | |
| | | | एकुण क्षेत्र | १००.८१ चौ.मी | | | | |
| | | | ग्रा.पं.नं. | ० | | | | |

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहुन देणार | वर्णन | | चतु:र्सिमा | | ख.ख.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | परमेश्वर श्रीनिवासराव पाटील | शिवाजी नरसिंगराव पाटील | स.नं. | ७७/२ | पु. | ९ मी रोड | ४०३२/२०२४ | |
| | | | प्लॉट नं. | ८० | प. | प्लॉट नं.८५ | | |
| | | | पु.प. | १२.१९ मी | द. | प्लॉट नं.७९ | | |
| | | | द.उ | ८.२७ मी | उ. | प्लॉट नं.८१ | | |
| | | | एकुण क्षेत्र | १००.८१ चौ.मी | | | | |
| | | | ग्रा.पं.नं. | ० | | | | |

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहुन देणार | वर्णन | | चतु:र्सिमा | | ख.ख.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | रितेश तानाजी पाटील | महादेवी उमेश सूर्यवंशी व इतर तीन | स.नं. | ११३/१ | पु. | प्लॉट नं.५ | २२७६/२०२३ | |
| | | | प्लॉट नं. | ६ | प. | प्लॉट नं.७ | | |
| | | | पु.प. | ४५' | द. | २५ फुट ग्रा.प रस्ता | | |
| | | | द.उ | ५९' | उ. | प्लॉट नं.२६ | | |
| | | | एकुण क्षेत्र | २६५५' | | | | |
| | | | ग्रा.पं.नं. | ४५७९ | | | | |

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहुन देणार | वर्णन | | चतु:र्सिमा | | ख.ख.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | शामला हनुमतराव उलीगडे | शीतल तानाजी सूर्यवंशी | स.नं. | ८३/ख | पु. | प्लॉट नं.२३ | ४६४२/२०२४ | |
| | | | प्लॉट नं. | १७ | प. | ४.५७ मी रोड | | |
| | | | पु.प. | १२.१९ मी | द. | प्लॉट नं.१८ | | |
| | | | द.उ | १२.१९ मी | उ. | ६.०९ मी रोड | | |
| | | | एकुण क्षेत्र | १४८.६९ चौ.मी | | | | |
| | | | ग्रा.पं.नं. | २७९५ | | | | |

| अ.क्र. | लिहुन घेणार | लिहुन देणार | वर्णन | | चतु:र्सिमा | | ख.ख.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | स.नं. | | पु. | | | |
| | | | प्लॉट नं. | | प. | | | |
| | | | पु.प. | | द. | | | |
| | | | द.उ | | उ. | | | |
| | | | एकुण क्षेत्र | | | | | |
| | | | ग्रा.पं.नं. | | | | | |

ग्रामसेवक उपसरपंच सरपंच

**ग्राम पंचायत कार्यालय निडेबन ता.उदगीर जि.लातूर**

# संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व - डॉ.स्मिता नागोरी लखोटिया

मविद्या विनयन शोभतेफ या उक्तीला शोभणारे शिक्षक खूप कमी असतात. ज्ञानदान करत असताना विद्यार्थ्यांना शिस्त लागली पाहिजे, त्यांच्यावर संस्कार झाले पाहिजेत, तसेच त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना मदत देखील करता यावी, या उद्देशाने आपल्या शिक्षकी पेशाचा प्रवास करणारे आद-रणीय डॉ. स्मिता लखोटिया मॅडम दि.३१ ऑगस्ट २०२४ ला प्रदीर्घ सेवेनंतर महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातून सेवानिवृत्त होत आहेत. विद्येमुळे जी-वनास कृतार्थता आणि व्यक्तीस एक वेगळी श्रेष्ठता लाभते, असे आपण नेहमीच ऐकत आलो आहोत. या प्रमेयास अगदी खऱ्या उतरणाऱ्या, असंख्य विद्यार्थी- विद्यार्थिनींच्या जीवनात चैतन्य निर्माण करणाऱ्या, आपल्या अध्यापनाच्या कार्यातून माझ्यासारख्या हजारो विद्यार्थ्यांच्या मनावरती कायमचा ठसा उमटणाऱ्या एक शिस्तप्रिय उद्यमशील शिक्षिका म्हणून सर्वांना परिचित असलेल्या प्रोफ़ेसर स्मिता नागोरी- लखोटिया या आहेत. उदगीर शहराच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात मागील ३७ वर्षापासून अविरतपणे कार्यरत राहून असंख्य विद्यार्थी घडवण्याचं कार्य मॅडमनी केले.

प्रोफ़ेसर स्मिता नागोरी लखोटिया यांचा जन्म औरंगाबाद येथे झाला. वडील प्राध्यापक व आई शिक्षिका असल्यामुळे या कुटुंबास सुरुवातीपासूनच विद्येचा मोह जडला. आजी स्वर्गीय प्रभादेवी नागोरी व आजोबा स्वर्गीय चंपालाल नागोरी हे स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे या कुटुंबाची अत्यंत शिस्तीत जडणघडण झालेली आहे. आजोबा व आजीमुळे घरात संस्कृती व राष्ट्र प्रेमाचे या कुटुंबाला धडे मिळाले.

डॉ. नागोरी यांचे शालेय शिक्षण औरंगाबादच्या सुप्रसिद्ध होली क्रॉस कॉन्व्हेंट इंग्लिश मीडियम या शाळे-तून पूर्ण केल्यानंतर त्यांनी बी.ए. इंग्रजीची पदवी प्राप्त करण्यासाठी शासकीय महाविद्यालय औरंगाबाद येथे प्रवेश घेतला. विद्यार्थी दशेतच अध्ययनाच्या आवडी बरोबरच त्यांनी कथक व भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्य प्रकारात काही पारितोषिकही मिळविले. त्याचबरोबर बॅडमिंटनची ही विशेष आवड त्यांनी जोपासली. कलेची आवड असल्यामुळेच युवक महोत्सवामध्ये संघव्यवस्थापिका म्हणून अनेक वर्ष त्यांनी उत्कृष्टपणे कामगिरी बजावली.

बी.ए.च्या अंतिम वर्षात असतानाच त्यांचा विवाह उदगीर येथील सुप्रसिद्ध भुलतज्ञ डॉ. रामाप्रसाद लखोटिया यांच्याशी झाला. डॉ. रामप्रसाद लखोटिया मूळचे कर्नाटकातील औराद तालुक्यातील तोरण्याचे. तोरणा हे उदगीर पासून ३० किलोमीटरच्या अंतरावर असलेले छोटेसे खेडेगाव. याच छोट्याशा खेडेगावामध्ये डॉ.स्मिता नागोरी या लखोटिया परिवाराच्या सून म्हणून १९८४ साली आल्या. डॉ. रामाप्रसाद लखोटिया यांच्या आईचे निधन ते लहान असतानाच झाल्यामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी ही मॅडमवरती येऊन पडली. जेव्हा त्या सासरी आल्या तेव्हा त्यांच्या छोट्या नणंद इयत्ता सहावी मध्ये तर छोटे दीर नववी मध्ये शिक्षण घेत होते. नणंद व दिरांच्या शिक्षणासोबतच मॅडमनी आपले पती डॉक्टर साहेब यांच्या परवानगीने आपलेही शिक्षण चालू ठेवले. मुळातच अध्ययनाची आवड असलेल्या मॅडमनी मराठवाडा विद्यापीठातून बी.ए.ची पदवी द्वितीय क्रमांकानी प्राप्त केली.त्यानंतर त्याच विद्यापीठातून त्यांनी एम.ए. इंग्रजीचे पदव्युत्तर शिक्षण पाचव्या क्रमांनी उत्तीर्ण होऊन पूर्ण केले.

उच्च शिक्षणानंतर त्यांनी उदगीरच्या नामांकित अशा विद्यावर्धिनी हायस्कूल मध्ये १९८७ ते १९९० या कालावधीमध्ये माध्यमिक शिक्षिका म्हणून कार्य केले. त्यानंतर १९९० मध्ये उदगीर येथील थोर विचारवंत, प्राचार्य ना.य. डोळे सर प्राचार्य असलेल्या महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या मिळालेल्या संधीचे सोने करत आपल्या असंख्य कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत आपले अध्ययन सातत्याने चालूच ठेवले. त्यांच्या अध्यापनातील प्राविण्य पाहून संस्थेने त्यांची १९९९ साली वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून निवड केली. वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेली राज्य पात्रता परीक्षा अर्थात सेट ही परीक्षा मॅडम उत्तीर्ण झाले. अध्यापनाची कार्य सांभाळून ज्या परीक्षेबद्दलची उदगीर सारख्या ग्रामीण भागात सदरील परीक्षेच्या तयारीची कसलीही सोय नसताना त्यांनी स्वयअध्ययन करून सेट या राज्य पात्रता परीक्षेत यश मिळविले.

शैक्षणिक क्षेत्रात कार्य करत असताना दोन मुलींचा सांभाळ करत त्यांच्या शिक्षणाकडेही त्यांनी लक्ष दिले. मॅडम खूप कुटुंबवत्सल आहेत. याचा अनुभव विविध सणानिमित्त विशेष करून



दीपावळीला अनेकांना येतो. दीपावलीच्या निमित्ताने चार पिढ्यातील कुटुंबातील सगळेजण अनेक दिवस एकत्र येऊन राहतात. सगळ्यांना सोबत घेऊन एकत्रपणे जीवन कसं जगावं,याचा एक उत्तम उदाहरण म्हणून मॅडमच्या कुटुंबाकडे पाहता येईल.

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या विविध समित्यांचे प्रमुख व सदस्य म्हणूनही मॅडमनी काम पाहिले आहे. २०१५ साली महाविद्यालयातील न्याक विभागाच्या समन्वयक असताना महाविद्यालयाने पुनर्मूल्यांकनामध्ये अ दर्जा प्राप्त केला होता. महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या मुलींच्या वस्तीगृहाची जबाबदारी सन २०१२ ते अगदी अलीकडे सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने सांभाळले आहे. या काळामध्ये त्यांनी मुलींसाठी आरोग्यविषयक शिबिर, कराटे प्रशिक्षण , विविध शिबीरे, योगा शिबिर याचे आयोजन करून महाविद्यालयातील असंख्य मुलींना स्वावलंबी बनवण्यासाठी मेहनत घेतले. वस्तीगृहातील मुली ही आपल्याच मुली आहेत या भावनेने त्यांनी हे काम केले. त्यामुळे त्या मुलींना कधीच असं वाटलं नाही की, आपण आपल्या कुटुंबापासून दूर आहोत. विशेष करून ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थिनींसाठी मॅडम सर्वोत्परी मदत करत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत गेला. आजही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेविषयी एक न्यूनगंड व भीती असते. अशा विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा व साहित्य या विषयी रूची निर्माण करण्याचं काम मॅडमनी केले आहे. ग्रामीण भागातील त्यांचे अनेक विद्यार्थिनी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचे अस्तित्व निर्माण करून सन्मानाने जीवन जगत आहेत.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करत असताना कुटुंबातून त्यांचे पती डॉ.रामाप्रसाद लखोटिया यांचे नेहमीच त्यांना प्रोत्साहन राहिले आहे. त्याबद्दलही मॅडम नेहमीच त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. चिरंजीव डॉ.प्रवीण यांनीही आपल्या आईच्या अंगी असलेल्या गुणामुळे माझ्या या वैद्यकीय क्षेत्रातील प्रवासात नेहमीच प्रेरणा मिळाली, अशी भावना व्यक्त करतात. तसेच मॅडमच्या मुली सौ. कोमल व सौ.अंकिता याही आपल्या आईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आनंदी जीवन जगत आहेत.

९५ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन आयोजन करण्याचा मान महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाला मिळाला. या साहित्य संमेलनामध्ये बालकुमार साहित्य मंचाच्या प्रमुख म्हणून अत्यंत यशस्वीपणे त्यांनी आयोजन केले होते. यात कुटुंबातील चिरंजीव प्रवीण,स्नुषा सौभाग्यवती तृप्ती असोत किंवा पती डॉ. रामाप्रसाद लखोटिया असोत या सर्वांच्या कल्पनेतून तो कार्यक्रम अगदी यशस्वीपणे त्यांनी घेतलेला आहे. साहित्य संमेलनात काम करत असताना त्यांच्या समितीत अनेक सदस्यही होते. हे काम सार्वजनिक आहे असा विचार न करता संमेलन हे आपल्याच घरचं आहे. घरचा कार्यक्रम आहे या भावनेने तन-मन-धनाने मॅडमनी कार्य केले. त्यामुळे या संमेलनातील बाल व्यासपीठाची संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा झाली. आणि या व्यासपीठाला उदंड असा प्रतिसाद मिळाला.

अध्यापन करत असताना निवडलेल्या विषयाची परिपूर्ण तयारी त्या विषयाचे असंख्य संदर्भ घेऊनच त्यांनी परिपूर्ण अध्यापनाची कार्य केले आहे. मॅडमशी अध्यापनाची शैली ही अत्यंत सोपी व सहज आहे. मग ते भारतीय साहित्य किंवा अमेरिकन साहित्य असो. साहित्यातील प्रत्येक कलाकृती ही अत्यंत सहज व सोप्या पद्धतीने शिकवण्याची त्यांची पद्धत होती.

मी बी. ए.उत्तीर्ण झाल्यानंतर एम.ए. इंग्रजीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात २००३ साली प्रवेश घेतला.एम.ए इंग्रजी प्रथम वर्षात ८८ विद्यार्थी प्रवेशित होते . त्याच वर्षी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पदव्युत्तर शिक्षणासाठी सत्र पद्धतीचा अवलंब सुरू केला होता. परीक्षेचा पॅटर्न हा ८०+२० असा होता. सर्वप्रथमच एम.ए.ला अंतर्गत मूल्यमापनाचे २० गुण मिळणार असल्यामुळे ८८ पैकी जवळपास ८० विद्यार्थी वर्गामध्ये उपस्थित असायचे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी असलेला वर्गात शिकवत असताना मॅडमला मी कधीही विद्यार्थ्यावरती रागावताना पहिले नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे अध्यापनावरती असलेले अफ़ाट असे प्रभुत्व. अध्यापनावरती असलेल्या प्रभुत्वामुळे व अंगी असलेल्या शिस्तीमुळे पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी सुद्धा अगदी शांतपणे अध्ययनात रमत असत. त्यांच्या या गुणामुळे आम्हा सर्व विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्याबद्दलची एक आदरयुक्त भीती निर्माण झाली. आज आम्ही असंख्य विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयामध्ये व विद्यापीठांमध्ये कार्यरत आहोत. यामागे मॅडमचे मार्गदर्शन व प्रेरणा अतिशय महत्त्वाचे आहे. मकर्मण्येवाधिकारस्ते मा फ़लेशू कदाचनफ या यक्तीप्रमाणे फ़ळाची अपेक्षा न करता नि:स्वार्थपणे आपण काम करत राहावे, हा मॅडमचा वसतुपाठ. परिश्रम कधीच वाया जात नाही यावर मॅडमचा पूर्ण विश्वास आहे. विद्यार्थ्याबरोबर मॅडमचं जितकं जिव्हाळ्याचं नातं होतं तितकच नातं मॅडमचं झाडांशी देखील आहे. त्यांच्या घरी विविध प्रकारची २००० रोपटे आहेत. आणि अगदी काळजीपूर्वक लेकराप्रमाणे त्याचा सांभाळ मॅडम करतात. हे सगळं पाहिल्यावर आपण भारावून गेल्याशिवाय राहत नाही. एक मितभाषी व उत्साही असे मॅडम माझ्यासाठी विद्यार्थी हेच स्वर्ग आहेत. या भावनेने स्वतःला झोकून देऊन काम केले.ते नेहमी सकारात्मक विचार करतात. त्यांच्या अध्यापनाचे कौशल्य, विचार व आचार हेच आम्हासारख्या असंख्य विद्यार्थ्यांसाठी दीपस्तभांसारखे ठरले. सेवानिवृत्तीनंतरचा मॅडमचा पुढचा काळ सुख समृद्धी व खूप खूप आनंदाचा जावो.हीच आम्हा सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने प्रार्थना!

**– प्रा.मनोहर भालके**
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

## शिवाजी विद्यालयाचा एकलिंगे आदित्य सिद्धेश्वर हा कुस्ती स्पर्धेत चाकूर तालुक्यातून सर्वप्रथम..



**उदगीर (प्रतिनिधी)** भगतसिंग विद्यालय,आष्टा तालुका चाकूर येथे तालुकास्तरीय फ्फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यालय रोहिना या विद्यालयाचा विद्यार्थी आदित्य सिद्धेश्वर एकलिंगे हा सर्वप्रथम आला असून जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी त्याची निवड झालेली आहे.ग्रामीण भागातून शेतकरी कुटुंबातून आलेल्या या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड सुपोष- पाणी आर्य, उपाध्यक्ष गिरीश मुंडकर,सचिव विक्रम संकाये,सहसचिव सौ.अंजुमनी ताई आर्य संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.तसेच शाळेचे मुख्याध्यापक आनंद चोबळे,. संजय देबडवार,क्रीडा शिक्षक विकास जमादार व शिक्षक वृंद व सर्वच ग्रामस्थांनी या घवघवीत यशाबद्दल आदित्य एकलिंगे यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे व पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या..

## नामवाड यांना सामाजिक कार्य गौरव पुरस्कार

**जळकोट (प्रतिनिधी)** शहरातील मुद्रांक विक्रेते तथा व्यवसायिक बळीराम नामवाड यांना दै. एकमतच्या वतीने सामाजिक कार्य गौरव पुरस्कार दिनांक २० ऑगस्ट रोजी दगडोजीराव देशमुख सभागृह लातूर येथे प्रदान करण्यात आला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, रेणा सहकारी साखर कारखाना चेअरमन, सर्जेराव मोरे, एकमत चे संपादक मंगेश देशपांडे, कृषी उत्पन्न बाजार समिती लातूर चे उपसभापती सुनील पडिले, ट्वेंटी., वन शुगरचे. व्हा. चेअरमन विजय देशमुख, लातूर जि. प. चे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, राम बोरगावकर, द्वारकादास श्याम कुमारचे तुकाराम पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

नामवाड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल नगराध्यक्ष प्रभावती कांबळे, उपनगराध्यक्ष मनमथ किडे, नगरसेवक महेश धूळशेटे, संग्राम नामवाड, संग्राम शिंदगीकर, लातूर ल.सा. क.म.चे. नरसिंग घोडके, राजकुमार नामवाड, संग्राम नामवाड, डॉ, भानुदास नामवाड, करुणाताई नामवाड, हरिश्चंद्र नामवाड, मारुती घोटरे, सतीश मुकले, मनोज जाधव, सेवानिवृत्त प्राचार्य, एस.बी. शिंगाडे आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय*
(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२८/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार निलेश शिवराज बावगे रा. निडेबन यांचे वडील नामे शिवराज माणिकराव बावगे यांचा मृत्यु दिनांक १८/१०/२०२२ रोजी मौजे निडेबन ता. उदगीर येथे झाला असून जन्मामृत्यु नोंदवहीला त्यांची मृत्युची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार यांनी त्यांचे वडील यांचा मृत्यु दिनांक १८/१०/२०२२ रोजीची नोंद जन्म/मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०८/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचे वडील यांचा मृत्यु दिनांक १८/१०/२०२२ रोजी मौजे निडेबन ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार निलेश शिवराज बावगे रा.निडेबन यांचे वडील नामे शिवराज माणिकराव बावगे यांचा मृत्यु दिनांक १८/१०/२०२२ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय निडेबन ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल. आज दिनांक २८/०८/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २९/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसिलदार, उदगीर

उदगीर मनोरंजन
कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोरे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



### संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाचे यश जिल्हास्तरीय शालेय योगा स्पर्धेसाठी चार विद्यार्थ्यांची निवड

अहमदपूर दि. ३० (बालाजी कारामुंगीकर) पावसाळी क्रीडा स्पर्धेत तालुका स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या योगासनाच्या स्पर्धा नुकत्याच अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय अहमदपूर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात संत ज्ञानेश्र्वर प्राथमिक विद्यालयाचा प्रणव काशिनाथ पुणे, वेदांत पुरुषोत्तम पंचारे, मुलींमधून सोनाक्षी संतोष दराडे, श्रेया प्रल्हाद करंडे या चार विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावरील योगा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा २८ व २९ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा क्रीडा संकुल लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या आहेत.

# विद्यार्थ्यांनी सामाजिक संशोधनाला अग्रक्रम द्यावा - प्राचार्य डॉ. हरिदास राठोड

अहमदपूर / प्रतिनिधी- महाविद्यालयीन विद्यार्थी हा समाज व्यवस्थेचा कणा असतो. समाजात वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. त्यासाठी केल्या जाणाऱ्या सर्वेक्षण आणि सामाजिक संशोधनाला अग्रक्रम देत पुढे यावे, असे आवाहन वसंतनगर ता. मुखेड येथील ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड यांनी केले.

डॉ. राठोड हे येथील महात्मा फुले महाविद्यालयात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ उद्घाटन व भित्तीपत्रकांच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सम्राट अशोक मित्रमंडळाचे अध्यक्ष, माजी नगरसेवक डॉ. सिद्धार्थ सूर्यवंशी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. राठोड म्हणाले की, चांगले विद्यार्थी घडविणे म्हणजे देशाचे सक्षम नागरिक घडविणे होय. विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव जागृत ठेवून समाजाप्रतीचे ऋण फेडण्यासाठी पुढे आले पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, सामाजिक शास्त्रे ही जगात सर्वत्र अभ्यासली जाणारी ज्ञान शाखा असून, सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ म्हणजे समाजशास्त्रज्ञ घडविणारी कार्यशाळा होय. भित्तीपत्रकांच्या माध्यमातून विचारवंत, लेखक, कार्यकर्ते तयार होतात, असेही ते म्हणाले. यावेळी एम.ए. लोकप्रशासन या वर्गात विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, क्रीडा आणि




तत्त्वज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश चौकटे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन गर्जे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सतीश ससाणे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मिरवणूक सोहळा तेलगाव मध्ये जल्लोषात साजरी

अहमदपूर / प्रतिनिधी- अहमदपूर तालुक्यातील तेलगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ आणाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दुपारी डॉ शेख अब्दुल रहेमान यांच्या रहेमान फाउंडेशनच्या वतीने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डॉ शेख अब्दुल यांच्यावतीने तेलगाव गावातील सामाजिक बांधिलकी जपत सहकार्याचे मोठे योगदान असते. कोणत्याही कार्यात मदत करत असतात. सायंकाळी पाच वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ शेख अब्दुल यांच्या हस्ते करून डॉल्बीच्या गजरात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे गावभर मिरवणूक काढण्यात आली. यावेळी डॉ अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सवाचे अध्यक्ष ज्ञानेश्र्वर साधू, उपाध्यक्ष ज्ञानेश्र्वर तेलंगे, मारुती कांबळे, बालाजी तपघाले, वैभव तपघाले, वैजनाथ तपघाले, दत्ता तपघाले, भुजंग जाधव, अशोक कांबळे, अण्णाभाऊ तेलंगे, हरीराम तपघाले, भरत कांबळे, संतोष तेलंगे, महेश तपघाले व महिला आणि समाज बांधव व गावातील नागरिक मोठ्या संख्येने या जयंतीत उपस्थित होते.

# प्रा.पी.टी.पवार सरांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्ताने विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

हडोळती / प्रतिनिधी- हडोळती तालुका अहमदपूर येथील दयानंद विद्यालय व श्रीहरी प्राथमिक विद्यामंदिर शाळेत प्रा. पी .टी. पवार सर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने पी.टी.पवार सरांना ७५ वर्ष पूर्ण झाल्यामुळे शाळेतील ७५ विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पी. टी. पवार हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री बाळासाहेबजी जाधव साहेब, सचिव डॉ. निलेश भैय्या पवार सर,सरपंच शकुंतलाताई भोगे, उपसरपंच इंदुताई माधव पवार ,पोलीस पाटील बालाजी मिरकले, माजी प्राचार्य व्यंकटराव मुळके, प्राचार्य दीपक बच्चेवार, हिप्पळगाव चे सरपंच महेश हंबीर, माजी प्राचार्य ईश्र्वर जोगदंड, प्राचार्य कौडगावे जी.व्ही., मुख्याध्यापक अर्जुन कानवटे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी प्रा. पी.टी. पवार सरांना ७५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे शाळेतील ७५ विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले,दहावी मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतील शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.




अमोल जाधव पाटोदेकर यांच्यातर्फे दहावीत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना दहा हजार रुपयाचे बक्षीस देण्यात आले. शाळेत वर्षभर टॉप टेन परीक्षा घेण्यात आली त्या परीक्षेतील टॉप ऑफ द इयर व टॉप टेन विद्यार्थ्यांची निवड करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या सर्व विद्यार्थ्यांना ट्रॉफी व पुष्पहार देऊन त्यांचा व पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच श्रीहरी प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील बाल विकास परीक्षेत टॉप टेन ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला .या कार्यक्रमासाठी हाडोळती व परिसरातील विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, श्रीमती शितल विश्वासराव देशपांडे ह्या दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म. लातूर या संस्थेच्या नाममात्र सभासद होत्या. सदर संस्थेतील सर्वे नं. २७/ब/२ (कन्हेरी) मधील संस्थेच्या शॉपिंग सेंटरमधील पहिल्या मजल्यावरील दुकान नं. १०८ हे त्यांचे नावावर वर्ग करण्यात आले होते. सदरील दुकान नं. १०८ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग दिपिका संजय चितकोटे रा. लातूर यांच्या नावाने हस्तांतर (वर्ग) करणेचा प्रस्ताव संस्थेकडे दि. २६/०७/२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर दुकान नं. १०८ पैकी पश्चिमेकडील अर्धा भाग च्या हस्तांतरणाबाबत कोणाचे काही आक्षेप अथवा उजर, तक्रार जसे की गहाणखत, खरेदीखत, दानपत्र, बक्षिसपत्र, ठरावपत्र, वारसाहक्क, न्यायालयीन प्रकरण व त्यातील आदेश, महानगरपालिकेचे आरक्षण, इच्छापत्र, तारण इ. असल्यास सर्व संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यातारखेपासून ०७ दिवसाच्या आत दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेच्या कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात पुराव्यासह हरकत सादर करावी. याबाबत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर दुकान निर्विवाद आहे असे समजून सदरील दुकान / मिळकत दिपिका संजय चितकोटे यांच्या नावावर वर्ग (हस्तांतर) करणेची योग्य ती कार्यवाही संस्थेकडून करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी. दिनांक : २९/०८/२०२४

**दि आदर्श सहकारी (भा.मा.)**
**गृहनिर्माण संस्था म.लातूर.**

## जाहीर प्रगटन

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, श्रीमती शितल विश्र्वासराव देशपांडे ह्या दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेच्या नाममात्र सभासद होत्या. सदर संस्थेतील सर्वे नं. २७/ब/२ (कन्हेरी) मधील संस्थेच्या शॉपिंग सेंटरमधील पहिल्या मजल्यावरील दुकान नं. १०८ हे त्यांचे नावावर वर्ग करण्यात आले होते. सदरील दुकान नं. १०८ पैकी पूर्वेकडील अर्धा भाग सौ. विमल धोंडीराम हुडगे, रा. लातूर यांच्या नावाने हस्तांतर (वर्ग) करणेचा प्रस्ताव संस्थेकडे दि. २६/०७/२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर दुकान नं. १०८ पैकी पूर्वेकडील अर्धा भाग च्या हस्तांतरणाबाबत कोणाचे काही आक्षेप अथवा उजर, तक्रार जसे की गहाणखत, खरेदीखत, दानपत्र, बक्षिसपत्र, ठरावपत्र, वारसाहक्क, न्यायालयीन प्रकरण व त्यातील आदेश, महानगरपालिकेचे आरक्षण, इच्छापत्र, तारण इ. असल्यास सर्व संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यातारखेपासून ०७ दिवसाच्या आत दि आदर्श संहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेच्या कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात पुराव्यासह हरकत सादर करावी. याबाबत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर दुकान निर्विवाद आहे असे समजून सदरील दुकान / मिळकत सौ. विमल धोंडीराम हुडगे यांच्या नावावर वर्ग (हस्तांतर) करणेची योग्य ती कार्यवाही संस्थेकडून करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी. दिनांक :२९/०८/२०२४

प्रचिव
दि आदर्श सहकारी (भा.मा.)
गृहनिर्माण संस्था म.लातूर.

## जाहीर नोटीस
### मुंबई येथील न्यायाधिकारी हायकोर्टात, खंडपीठ औरंगाबाद

कोर्टाचा शिक्का

हुकुमाची तारिख २१ माहे, जून सन दोन हजार चोवीस.
दुसरे अपील नंबर २४८/२०१८ सन २० पैकी

**जिल्हा न्यायाधीश लातूर कोर्टाचा रे. दि. अपील नंबर ३५ सन २००८**

जयश्री पांडुरंग कांबळे व ईतर,
अर्जदार....
तर्फे अॅड. आर. बी. देशमुख
आर. आर. देशमुख
आर.आर. देशमुख

विरुद्ध

प्रति,
सा.नं. ६ रत्नमाला पी धोंडेराव वय ४० वर्षे, धंदा शेती,
सा.नं. ८ दिगंबर निवृत्ती कांबळे मयत तर्फे वारस सा.नं. ८एफ मंगल अमोल कांबळे वय ४४ वर्षे, धंदा घरकाम,
रा. उटी (Uti), ता. औसा, जि. लातूर.

सामनेवाले......

दावा रूपये कोर्टफीसाठी रूपये अधिकारासाठी

सदरहू सामनेवाला सा. नं. ६ व ८ एफ राहणार वरिलप्रमाणे मजकूर यास सलाम तुम्हास कळावे की, सदरील लिहिलेले मुकादम्यातील जिल्हा न्यायाधीश लातूर जनता याचे मध्यावर दर अर्जदार जयश्री पांडुरंग कांबळे व ईतर यानी दुसरे अपील दिले असून या कोर्टाचे रजिस्टरात दाखल करण्यात आले या दुस-या अपिलाची कशी तारीख १९ माहे ऑगस्ट सन २०१४ रोजी नोटीस असा या कोर्टाने हुकुम केला आहे.

यास्तव तुमच्यातर्फे तुम्ही स्वतः किंवा तुमचा अॅडव्होकेट किंवा तुमच्यातर्फे मुकदमा चालविण्यास कायद्यावरून ज्यास अधिकार आहे असा कोणी असामी सदरहू दुसरे अपील चालविण्यास हजर झाला नाही तर तुमच्या परोक्ष एकतर्फी त्या अपिलाची चौकशी होऊन निकाल करण्यात येईल, यास साक्ष माननीय श्री देवेंद्र कुमार उपाध्याय सदरहू मुंबई येथील मुख्य न्यायाधिकारी आज तारिख २१ माहे जून, सन दोन हजार चोवीस.

आरती एच. चोपकर
के. आर. गरंडवाल

**फॉर डेप्युटी रजिस्ट्रार,**
**के. डी. बुरकुले**

## जाहीर नोटीस
### मुंबई येथील न्यायाधिकारी हायकोर्टात, खंडपीठ औरंगाबाद

कोर्टाचा शिक्का

दिवाणी अर्ज नंबर ४२४८ सन २०१८ मध्ये
दुसरे अपील नंबर २४८ सन २०१८
जिल्हा न्यायाधीश
लातूर कोर्टाचा
रे. दि. अपील नंबर ३५ सन २००८

जयश्री पांडुरंग कांबळे व ईतर
अर्जदार....
तर्फे अॅड. आर. बी. देशमुख
आर. आर. देशमुख

विरूद्ध

प्रति,
सा.नं. ६,रत्नमाला पी धोंडेराव वय ४० वर्षे, धंदा शेती, सा.नं. ८, दिगंबर निवृत्ती कांबळे मयत तर्फे वारस सा.नं. ८ एफ, मंगल अमोल कांबळे वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. उटी (Uti), ता. औसा, जि. लातूर.

सामनेवाले..... सदरहू सामनेवाला नं. ६ व ८ एफ राहणार वरिलप्रमाणे मजकूर यास अर्जदारांनी या कोर्टास सोबत जोडलेल्या अर्जाच्या नकलेत नमूद केल्याप्रमाणे असा अर्ज केला आहे की अर्जदारांनी जिल्हा न्यायाधीश लातूर कोर्टाचा रे. दि. अ. नंबर ३५ सन २००८ यातील हुकूमनाम्यावर या नामदार कोर्टात सदरील नंबरचे दुसरे अपील दाखल केले असून त्यात सामनेवाला (रिस्पॉडिट) यांस नोटीस करण्याचा हुकूम झाला आहे अर्जदाराची अशी विनंती आहे की सदरहु दुसऱ्या अपिलाचा निकाल होईपर्यंत खालचे कोर्टाच हुकुमनाम्याची बजावणी तहकुब ठेवण्याचा हुकुम व्हावा.

सदरहू अर्ज तारिख २१ जून सन हजार चोवीस रोजी कोर्टात निघून हुकूम झाला त्याप्रमाणे तुम्हांस नोटीस देण्यात येते की, ही नोटीस तुम्हाला पोहचल्यापासून दिनांक १९ माहे ऑगस्ट सन २०२४ रोजी पोहोचल्यापासुन एक महिन्याच्या आत तुम्ही स्वतः किवा या कोर्टाने वकिलामार्फत या कोर्टात हजर होऊन अर्जदाराचे अर्जाप्रमाणे हुकूम का करु नये या विषयीचे कारण दाखवावे सदरहूप्रमाणे हजर होऊन कारण न दाखविल्यास अर्जदाराचे अर्जाप्रमाणे किंवा कोर्टास योग्य वाटेल ती हुकूम केला जाईल यास साक्ष नामदार माननीय श्री देवेंद्र कुमार उपाध्याय सदरह मुंबई येथील मुख्य न्यायाभिकारी तारिख २१ माहे जून, सन दोन हजार चोवीस.

**क्लार्क**
**आरती एच. चोपकर**
**कक्ष अधिकारी**
**के. आर. गरंडवाल**

**फॉर डेप्युटी रजिस्ट्रार,**
**के. डी. बुरकुले**

**DECLARATION**
**CHANGE OF NAME**

By this disclosure it is announced that my documentary name is SHAIKH KHAYYUMPASHA HAMJU. My other documentary name is KOTWAL KHAYUMPASHA HAMJUSAB. Next will be use this name is SHAIKH KHAYYUMPASHA HAMJU ,in my pravite and legal practice. Relatives should note this.

**OLD NAME**
KOTWAL KHAYUMPASHA HAMJUSAB
**NEW NAME**
SHAIKH KHAYYUMPASHA HAMJU
**ADDRESS**
At Takalgaon Post Parchanda
Tq -Ahmedpur Dist Latur 413515

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय-विभाग)**

जा.क्र.२०२४/एमएजी/कावी २०२
प्रति,
१. मंडळ अधिकारी, नळेगाव
ता.चाकूर
विषयःजन्म नोंद प्रमाणपत्र मिळणेबाबत
संदर्भः श्री. पटेल सिद्दीकी लईखअहमद रा. आटोळा ता. चाकूर जि. लातूर यांचा अर्ज दि. ०३.०४.२०२४

उपरोक्त विषयी संदर्भीय अर्जान्वये कळविण्यात येते की, श्री, पटेल सिद्दीकी लईखअहमद रा. अटोळा ता. चाकूर जि. लातूर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुलगा पटेल रिहान सिद्दीकी चा जन्म दि. १५/०६/१९७५ रोजी राहत्या घरी झाला असून मुख्याधिकारी नगरपंचायत जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदार यांचे सदर प्रकरणात योग्य ती चौकशी करून चौकशी अहवाल आपले अभिप्रायास स्वयं स्पष्ट अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार, तहसिल**
**कार्यालय, चाकूर**

DECLARATION
CHANGE OF NAME

By this disclosure it is announced that my documentary name is SHAIKH HASINABI KHAYYUMPASHA. My other documentary name is SAYYAD HASINA MAKHBUL SAB . Next will be use this name is SHAIKH HASINABI KHAYYUMPASHA ,in my pravite and legal practice. Relatives should note this.

**Old Name**
AYYAD HASINA MAKHBUL SAB
**New Name**
SHAIKH HASINABI KHAYYUMPASHA
**ADDRESS**
At Takalgaon(KAM) Post Parchanda Tq Ahmedpur Dist Latur 413515

**DECLARATION**
**CHANGE OF NAME**

By this disclosure it is announced that my documentary name is PALLA BEBIFATIMA KHAJAHUSSEN . My other documentary name is PALLA BIBI FATEMA KHAJAHUSSAIN. Next will be use this name is PALLA BEBIFATIMA KHAJAHUSSEN,in my pravite and legal practice. Relatives should note this.

**OLD NAME**
PALLA BIBI FATEMA KHAJA HUSSAIN
**NEW NAME**
PALLA BEBIFATIMA KHAJAHUSSEN
**ADDRESS**
BAIL BAJAR NALEGAON Dist Latur 413524


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे
कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

